दैनिक

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

जनप्रभात

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ शनिवार, दि.२९ मार्च २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक १६६ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे आज आगमन

दिलीप येवले/नागपूर : महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांचे आज शुक्रवार दि. २८ मार्च रोजी रात्री ९.४० वाजता मुंबई येथून विमानाने आगमन होइल व रात्री राजभवन येथे मुक्काम करतील. शनिवार दि. २९ मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता एम्स येथे आयोजीत पहिल्या पदवीदान समारंभात उपस्थित राहातील. त्या नंतर राजभवन येथे आगमन होईल व मुक्काम करतील. शनीवार दि. ३० मार्च रोजी सकाळी ८.४० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्री विमानतळ येथे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या आगमन प्रसंगी उपस्थित राहतील. प्रधानमंत्री यांच्या नागपूर शहरात नियोजीत कार्यक्रमाला राज्यपाल उपस्थित राहणार आहेत. दुपारी १.३५वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ येथे प्रधानमंत्री यांच्या प्रस्थाना प्रसंगी निरोप देण्यासाठी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन उपस्थित राहतील. त्यानंतर राजभवन येथे आगमण व राखीव. राज्यपाल सायंकाळी ६.४० वाजता राजभवन येथून विमानतळासाठी प्रयाण करतील व रात्री ७.३५ वाजता विमानाने मुंबईसाठी प्रयाण करतील.

रेशीम उद्योगातून विदर्भातील शेतकऱ्यांची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल

विदर्भातील शेतकरी हितासाठी रेशीम शेतीला शासनाचे पाठबळ

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : सततची नापिकी, लहरी निसर्ग, वातावरणातील बदल,जमिनीची मर्यादित सुपीकता यामुळे पारंपरिक पिकांवर अवलंबून राहणे जोखमीचे ठरते. अशावेळी कमी पाण्यावर होणारी तुती लागवड ही शेतकऱ्यांना अधिक फायदेशीर, आणि आर्थिक पाठबळ देणारी शाश्वत शेती म्हणून उत्तम पर्याय समोर येत आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांना रेशीम शेतीतून समृद्ध करण्यासाठी राज्य शासन केंद्र सरकारच्या सहकार्याने विविध योजनांची अंमलबाजवणी करीत आहे. यामुळे विदर्भातील शेतकऱ्यांची आत्मनिर्भरतेकडे वाटचाल होत आहे. त्यामुळे रेशीम शेतीला चालना देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

केंद्र शासनकडून यासाठी जो निधी मिळतो त्याचा प्रस्ताव तातडीने तयार करून केंद्र शासनाकडे पाठपुराव करावा अशा सूचनाही विभागाला मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत

केंद्र सरकार आणि राज्यशासन तसेच खासगी कंपन्या, सामाजिक संस्था यांच्या सामाजिक दायित्व निधीतून तुती व टसर उद्योगाचा एकात्मिक विकास करण्याबाबत मुख्यमंत्री यांच्या निर्देशानुसार तातडीने बैठक घेऊन रेशीम शेती संचालनालयाचे कार्यालय नसलेल्या जिल्ह्यांमध्ये तुती व टसर रेशीम उद्योगाच्या विकासासाठी पुणे जिल्ह्यातील उरळी कांचन येथील बाएफ या संस्थेची मदत होत आहे. या संस्थेच्या मदतीने रेशीम उद्योग कार्यालय कार्यान्वित करण्याबाबत नियोजन करण्यात आले आहे .

बाएफ संस्थेने तुती लागवड ते कापड निर्मितीतील मूल्यवर्धित साखळी निर्माण करण्यासाठी रेशीम संचालनालयास मदत करण्याबाबतचे सादरीकरण केले. तुती लागवड, अंडीपुंज ते कोष निर्मिती, कोषोत्तर प्रक्रीया उद्योगास चालना देवून समूह पद्धतीने विकास, त्याद्वारे मुल्यवर्धीत साखळी निर्माण करणे, रोजगाराच्या संधी उपलब्ध करणे याबाबत बाएफ व रेशीम संचालनालय यांनी क्षेत्रे निश्चित करावी. ज्या क्षेत्राच्या साखळी विकासामध्ये तुट अशा क्षेत्रातील तज्ज्ञ, कार्यरत व्यक्तींनी त्यासाठी बाएफ संस्थेने मुल्यवर्धीत साखळी निर्माण करुन स्थानिकांना रोजगार निर्मिती आणि रेशीम उद्योगाला चालना दिली आहे, अशा उरळी कांचन, जि. पुणे येथे प्रत्यक्ष भेट देवून पुढील दिशा व कार्यकक्षा निश्चित करण्यात येत आहे.

रेशीम शेती आणि वस्त्रोद्योगाला चालना देण्यासाठी केंद्र सरकारकडून रेशीम उद्योगासाठी आवश्यक निधी संदर्भात पाठपुरावा आणि राज्यातील रेशीम संदर्भातील संबंधित विभागाचा समनव्य करून याला अधिक गती देण्यात येत आहे. तुती लागवड, ऐन व अर्जुन वृक्ष लागवडीसाठी वन विभागाची मदत आणि. झोमॅटो व झेप्टो या कंपनीच्या सामाजिक दायीत्व निधीतून आदिवासी जिल्ह्यामध्ये तुती, ऐन व अर्जुन वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घेण्यात येत अजून याबाबतच कृती आराखडा तयार करण्यात येणार आहे.

टसर क्षेत्रामध्ये रेशीम अळीचे संगोपन करताना शेतकऱ्यांना येणाऱ्या अडचणी संदर्भात संबधित जिल्ह्यातील वनविभागाचे अधिकारी, प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी विशेष लक्ष देऊन शेतकऱ्यांना तातडीने सहकार्य करण्याचे नियोजन करावे. निधीची आवश्यकता असल्यास किंवा प्रस्ताव प्रलंबित असल्यास त्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयामार्फत पाठपुरावा करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करण्यात येत आहे.

तुती व टसर क्षेत्रातील विकासाकरिता विशेषतः महीला व अदिवासी घटकांना उत्पन्नाचे साधन निर्माण करण्यासाठी पुढील ५ वर्षामध्ये १० हजार लाभार्थ्यांसाठी सर्वसमावेशक कृती आराखडा तयार करण्यात येत आहे.

जिल्हा वार्षिक योजनेतून रेशीम शेतीला प्रोत्साहन

राज्यातील तुती व तसर रेशीम शेतकऱ्यांना जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत ७५ टक्के इतक्या सवलतीच्या दरात अंडीपुंज पुरवठा करण्यात येत आहे. तसेच राज्यांतर्गत रेशीम शेती नवनवीन प्रयोग पाहण्यासाठी अभ्यास दौरा आयोजित करण्यात येतो. रेशीम शेतकऱ्यांना विद्या वेतनासह १५ दिवसांचे तांत्रिक प्रशिक्षणही देण्यात येत आहे.

रेशीम शेती करणाऱ्या शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या रेशीम कोषांना उत्पादनावर आधारित प्रोत्साहन पर अनुदान, सूत उत्पादन अनुदान योजना, ग्रामीण भागात रोजगार निर्मिती रेशीम सुत उत्पादनासाठी आर्थिक सहाय्य आधुनिक यंत्रसामग्रीसाठी अनुदान, मल्टी अँड रेलिंग युनिट १०० प्रति किलो अनुदान, ऑटोमॅटिक रेलिंग युनिट १५० रुपये प्रति किलो, अनुदान टसर रीलींग युनिट १०० रुपये प्रति किलो अनुदान देण्यात येत आहे.

यासाठी केंद्र व राज्य शासनाच्या योजनांचा उपयोग करून, योग्य तंत्रज्ञान, शेकऱ्यांना मार्गदर्शन आणि प्रोत्साहन देऊन ग्रामीण, दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी त्यांना आर्थिक सक्षमता मिळू देण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. याच बरोबर आदिवासी, ग्रामीण भागात तुतीची लागवड आणि रेशीम उत्पादनामुळे स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणत रोजगारनिर्मितीला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री कार्यालयातून विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत.

राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात २५ कोटी ४४ लाखांचे अनुदान जमा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : राज्यातील ५६० गोशाळांच्या बँक खात्यात देशी गोवंश परिपोषण योजनेचे २५ कोटी ४४ लाख रुपयांचे अनुदान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाइन पद्धतीने जमा करण्यात आले.

जानेवारी, फेब्रुवारी व मार्च असे ३ महिन्याचे अनुदान आहे. गोशाळांमध्ये ठेवण्यात येणाऱ्या देशी गायींच्या पालनपोषणासाठी प्रती दिन प्रती गाय रु. ५०/- अनुदान योजनेंतर्गत राज्यातील ५६० गोशाळांमधील ५६ हजार ५६९ गायींसाठी पहिल्या टप्प्यात २५ कोटी ४५ लाख ६० हजार ५०० रुपये इतके अनुदान महाराष्ट्र गोसेवा आयोगामार्फत लाभार्थी गोशाळांना वितरित करण्यात आले.

महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या या कार्याबद्दल मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी राज्य गोसेवा आयोगाचे अभिनंदन केले. देशी गोवंश संवर्धन ही काळाची गरज असून, देशी गोवंशाचे संवर्धनामुळे ग्रामीण विभागाचा विकास गतिमान होण्यास मदत होणार आहे. राज्यातील अधिकाधीक गोशाळांना या योजनेचा लाभ देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे अध्यक्ष, सदस्य, अधिकारी व कर्मचारी प्रयत्नशील असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी आयोगाच्या या कार्याला शुभेच्छा दिल्या असून, देशी गोसंवर्धनाला चालना देण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाच्या माध्यमातून देशी गोवंश संवर्धनाचे सुरु असलेले काम प्रशंसनीय आहे. यामुळे देशी गोवंश संरक्षण व संवर्धन होणार असल्याचे, म्हटले आहे.

देशी गायींची उत्पादनक्षमता कमी आहे. त्यामुळे त्यांचे संगोपन करणे व्यावसायिकदृष्ट्या किफायतशीर ठरत नाही. तसेच भाकड - अनुत्पादक गायींचे संगोपन करणे पशुपालकांना फायदेशीर ठरत नाही. असे पुशधन गोशाळेत ठेवण्यात येतात. अशा गोशाळांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणी असलेल्या गोशाळेतील गायींना ५०/- रुपये प्रती दिन गोवंश परिपोषण योजना सुरु केली आहे. ही योजना राज्यातील शेकडो गोशाळांना दिलासादायक ठरली असून, यातून आतापर्यंत ५६० गोशाळांना प्रत्यक्ष लाभ देण्यात आल्याचे आयोगाचे अध्यक्ष शेखर मुंदडा यांनी सांगितले.

ऑनलाईन अनुदान वितरण प्रसंगी आयोगाचे अध्यक्ष श्री. मुंदडा, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, महाराष्ट्र गोसेवा आयोगाचे सदस्य आदी मान्यवर उपस्थित होते.

असे आहे योजनेचे स्वरुप

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळांतील भारत पशुधन प्रणालीवर नोंद असलेल्या देशी गायींच्या परिपोषणासाठी प्रती दिन अनुदान देय राहिल. अनुदानाची रक्कमः रुपये ५० /- प्रती दिन प्रती देशी गाय असे आहे.

अनुदान पात्रतेच्या अटी

महाराष्ट्र गोसेवा आयोगाकडे नोंदणीकृत असलेल्या गोशाळा, गोसदन, पांजरपोळ व गोरक्षण संस्था अनुदानासाठी पात्र आहेत. संस्थेस गोसंगोपनाचा कमीतकमी तीन वर्षाचा अनुभव असावा. गोशाळेत किमान ५० गोवंशीय पशुधन असणे आवश्यक आहे. संस्थेतील गोवंशीय पशुधनास ईअर टॅगिंग करणे अनिवार्य आहे. ईअर टॅगिंग झालेले गोवंशीय पशुधन अनुदानास पात्र आहे. संस्थेचे राष्ट्रीयकृत बँकेत खाते असणे आवश्यक आहे.

राज्यातील महामार्गांवर महिलांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह ; महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे

वृत्तसंस्था ■ मुंबई





मुंबई : चौथ्या महिला धोरणात महिलांसाठी आरोग्य आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करण्याबाबत अधिक प्राधान्य देण्यात येणार आहे. यानुसार महामार्गावर प्रत्येक २५ किलो मीटर अंतरावर सुसज्ज स्वच्छतागृह बांधण्यात येणार आहेत. या स्वच्छतागृहांचे देखभाल व व्यवस्थापन स्थानिक महिला बचतगटामार्फत करण्यात येईल. याशिवाय महामार्गावर बचतगटांना उत्पादनांची विक्री व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

महिला धोरणात महिलांच्या सुरक्षेला अधिक प्राधान्य देताना राज्यातील महामार्गावरील स्वच्छतागृहांची दुरावस्था दूर करण्याबाबतही अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले होते. यात प्रामुख्याने राज्यातील राज्य महामार्ग, राष्ट्रीय महामार्ग, समृद्धी महामार्गासह द्रुतगती महामार्गांवर प्रत्येक २५ किलोमीटर अंतरावर महिलांसाठी स्वच्छतागृह उभारण्याचे निश्चित करण्यात आले होते. महिला व बाल विकास विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समन्वयातून हा प्रकल्प राबविला जाणार असल्याची माहिती मंत्री तटकरे यांनी दिली.

स्वच्छतागृहांचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग करणार असून, जन सुविधा केंद्राचे व्यवस्थापन माविम स्थापित बचत गटांमार्फत करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा ३० मार्च रोजी महाराष्ट्र दौरा; नागपुरात विविध प्रकल्पांचे उद्घाटन आणि अभिवादन कार्यक्रम

वृत्तसंस्था ■ नवी दिल्ली

नवी दिल्ली, दि. २८ : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी ३० मार्च रोजी महाराष्ट्राच्या दौऱ्यावर येणार असून, नागपुरातील विविध महत्त्वाच्या कार्यक्रमांना उपस्थित राहणार आहेत.

प्रधानमंत्री श्री. मोदी यांच्या हस्ते सोलार डिफेन्स आणि एअरोस्पेस लिमिटेड येथे संरक्षण क्षेत्रातील अत्याधुनिक प्रकल्पांचे उद्घाटन होणार आहे. यामध्ये अनमॅन्ड एरियल व्हेईकल्ससाठी १२५० मीटर लांबीची विशेष धावपट्टी आणि लोइटरिंग म्युनिशन चाचणीसाठी अत्याधुनिक सुविधा राष्ट्राला समर्पित केली जाणार आहे. तसेच नागपुरातील माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरच्या विस्तार प्रकल्पाची पायाभरणीही प्रधानमंत्र्यांच्या उपस्थितीत केली जाणार आहे. या प्रकल्पांतर्गत २५० खाटांचे रुग्णालय, १४ बाह्यरुग्ण विभाग आणि अत्याधुनिक १४ ऑपरेशन थिएटर उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे नागपूर आणि विदर्भातील नागरिकांना जागतिक दर्जाच्या नेत्रचिकित्सा सुविधा उपलब्ध होणार आहेत.

प्रधानमंत्री श्री. मोदी दीक्षाभूमी येथे जाऊन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन करणार आहेत. तसेच, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या 'प्रतिपदा' कार्यक्रमानिमित्त स्मृती मंदिराला भेट देऊन संघ संस्थापकांना अभिवादन करतील.

पत्नीच्या अंगावर रॉकेल टाकून पेटवले, २३ वर्षीय महिला गंभीर भाजली

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : चारित्र्याच्या संशयावरून २३ वर्षीय महिलेच्या अंगावर तिच्या पतीने रॉकेल टाकून तिला पेटवून दिल्याचा प्रकार वांद्रे पूर्व परिसरात घडला आहे. त्यात महिला गंभीर जखमी झाल्या असून त्यांच्यावर कस्तुरबा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. याप्रकरणी निर्मल नगर पोलिसांनी हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून आरोपी पतीला गुरूवारी अटक केली. सिमरन सलमान कुरेशी (२३) असे जखमी महिलेचे नाव आहे. त्या वांद्रे पूर्व येथील बेहरामपाडा परिसरातील लकडेवाला गल्ली येथे पतीसोबत राहतात. त्याचा पती सलमान इरशाद कुरेशी याचा कपडे विक्रीचा व्यवसाय आहे. २१ मार्चला महिला व पतीमध्ये घरात असताना त्यांच्या भांडण झाले. त्यातून संतापलेल्या सलमानने पत्नीला शिवीगाळ व मारहाण केली. त्यानंतर त्याचा राग एवढा अनावर झाला की त्याने घरातील रॉकेल आणले आणि पत्नीच्या अंगावर ओतले. त्यानंतर माचिसच्या काडीने आग लावली.

आगीमुळे महिला गंभीर भाजली. तिला स्थानिक रुग्णालयात नेण्यात आले. तिची अवस्था गंभीर असल्यामुळे तिला तात्काळ कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे तिच्यावर उपचार सुरू आहेत. आगीमुळे महिला ४५ टक्के भाजली आहे. संपूर्ण अंगावर जखमा आहेत. उपचारादरम्यान मुलीची स्थिती थोडी स्थीर झाल्यानंतर तिला याबाबत विचारण्यात आले. अखेर तिची आई गौरी कुरेशी (४५) यांच्या जबाबानुसार हा प्रकार पतीने केल्याचे निष्पन्न झाल्यानंतर निर्मल नगर पोलिसांना याबाबतची माहिती देण्यात आली. त्यानुसार निर्मल नगर पोलिसांनी गुरूवारी गौरी कुरेशी यांचा सविस्तर जबाब नोंदवून मुलीचा पती सलमान कुरेशी (३४) याच्याविरोधात हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.

जखमी महिला व आरोपी पतीमध्ये नेहमी भांडणे होत होती. आरोपी पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत होता. त्यामुळे व्यवसायावरून आल्यानंतर तिच्याशी वाद घालायचा. त्यांच्यात २१ मार्चलाही कडाक्याचे भांडण झाले. त्यात आरोपीने पीडित महिलेला शिवीगाळ व मारहाणही केली. त्यानंतर त्याने अंगावर रॉकेल ओतून तिला पेटवून दिले. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर निर्मल नगर पोलिसांनी रुग्णालयातून आरोपी सलमान कुरेशीला गुरूवारी अटक केली. त्याच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम १०९, ७९, ११५ (२), ३५२ अंतर्गत हत्येच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपीचा गुन्हेगारी पूर्व इतिहास तपासण्यात आला असून त्याच्याविरोधात यापूर्वी कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे पोलिसांनी सांगितले. सुरूवातीला याप्रकरणी ईपीआर दाखल करण्यात आला होता. पण तक्रारीनंतर आम्ही गुन्हा दाखल करून आरोपीला अटक केल्याचे पोलिसांनी सांगितले.

महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणात परिसंवादांची भूमिका मोलाची : मंत्री आदिती तटकरे

सशक्ती परिसंवाद २०२४-२५ कार्यक्रम संपन्न

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : महिलांना आर्थिक साक्षरतेच्या सहाय्याने स्वावलंबी करण्यासाठी महिला व बाल विकास विभाग आणि महिला आर्थिक विकास महामंडळ सकारात्मक उपक्रम राबवित आहे. मविमने सशक्ती कॉन्क्लेव्हच्या (परिसंवाद) माध्यमातून ५५,००० हून अधिक महिलांना सक्षम बनवण्यासाठी उद्योग उभारणीत सहकार्य केल्याचा आनंद महिला व बाल विकास मंत्री आदिती तटकरे यांनी व्यक्त केला.

मास्टरकार्डच्या पाठिंब्याने आणि लर्निंग लिंक्स फाउंडेशन (थ्रेड) द्वारे राबविण्यात आलेल्या सशक्ती कॉन्क्लेव्ह २०२४-२५ चे आयोजन नुकतेच नवी मुंबई येथे करण्यात आले होते.

यावेळी खासदार नारायण राणे, माविमच्या व्यवस्थापकीय संचालिका वर्षा लड्ढा, लर्निंग लिंग फाऊंडेशनच्या अध्यक्ष नुरीया अन्सारी, मार्स्टर कार्डचे वरिष्ठ व्यवस्थापकीय संचालक शरदचंद्रण संग्राम, पुनीत तळोजा यांच्यासह अनेक बचत गटांच्या महिला प्रातिनिधीक स्वरूपात उपस्थित होत्या.

या परिसंवादात महिलांशी संवाद साधतांना मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, राज्यातील महिलांना शिक्षणाबरोबरच आर्थिक आत्मनिर्भर होण्यासाठी विविध योजनांच्या माध्यमातून सातत्याने प्रोत्साहित करण्यात येत आहेत. यासाठी राज्यातील जास्तीत जास्त महिलांना आर्थिक साक्षर करणे हे महत्वाचे उद्दिष्ट विभागाने डोळ्यासमोर ठेवले आहे. बचतगटांनी छोटे-मोठे उद्योग व्यवसायाबरोबरच मोठे व्यवसाय सुरू करण्यासाठी सुद्धा प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी शासनस्तरावर महिलांना सर्वोतोपरी मदत करण्यात येत आहेत. मोबाईलमुळे मोठी क्रांती झालेली आपल्याला पहावयास मिळते. मोबाईलसारख्या गॅझेटच्या माध्यमातून आर्थिक देवाण घेवाण करतांना महिलांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अशा वेळी महिलांना अशा परिसंवादाच्या माध्यमातून आर्थिक देवाण-घेवाण करतांना कशा प्रकारे आपण खबरदारी घेतली पाहिजे याविषयी परिसंवादाच्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात येणार आहे.

लघु उद्योगामुळे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत

देशात महिलांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. महिलांनी छोटे-मोठे उद्योग व्यवसाय सुरू करून आर्थिक सक्षम होण्याचा निर्धार. यामुळे कुंटुबाला आर्थिक हातभार तर लागेलच परंतू निर्णय घेण्याचे स्वातंत्र देखील मिळणार आहे. महिलांनी सूरू केलेल्या उद्योग व्यसायामुळे देशाचे दरडोई उत्पन्न वाढण्यास मदत होणार आहे. यासाठी केंद्र आणि राज्य शासन सदैव महिलांच्या पाठीशी उभे असल्याचे खासदार नारायण राणे यांनी सांगितले.

व्यवस्थापकीय संचालक वर्षा लड्ढा म्हणाल्या की, माविम आणि लर्निंग लिंक्स फाउंडेशन (थ्रेड) सारख्या स्वयंसेवी संस्थांमधील सहकार्यामुळे स्वयं-मदत गट (एउ) सक्षम होण्यासाठी मदत होत आहे. २००० महिलांना एल एल एफ ने प्रशिक्षण देऊन, २०० महिलांना एलएलएफ-मास्टरकार्ड भागीदारी अंतर्गत अनुदान प्रदान केले. यामुळे यशस्वीरित्या त्यांचे व्यवसाय सुरू आहेत. हे खरोखरच प्रशंसनीय आहे.

रस्ते झाडांच्या मुळावर; कंत्राटदाराला ५० हजारांचा दंड

वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई: मुंबई शहर व उपनगरांत सुरू असलेल्या रस्ते कामांचा फटका झाडांना बसू लागला आहे. प्रभादेवी येथे ५० ते ६० झाडांच्या मुळांना रस्ते कामादरम्यान धक्का लागल्याचे निदर्शनास आल्याने संबंधित कंत्राटदाराला ५० हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. कामादरम्यान योग्य खबरदारी घेण्यात न आल्याने ३५ ते ४५ वर्षे जुन्या झाडांचे नुकसान झाले आहे. त्यामुळे संबंधित कंत्राटदारावर दंडात्मक कारवाई करण्यात आली असून नुकसान झालेल्या झाडांमध्ये सोनमोहर, गुलमोहर, जांभूळ, वड, पिंपळ, भेंडी, अशोकाचा समावेश आहे.

खड्डेमुक्त मुंबईचे उद्दिष्ट गाठण्यासाठी महानगरपालिकेने रस्ते काँक्रिटीकरणाचा प्रकल्प हाती घेतला आहे. तसेच, विहित मुदतीत ही कामे पूर्ण व्हावीत, यासाठी काँक्रिटीकरणाच्या कामांना वेग देण्यात आला आहे. मात्र, काम जलद गतीने पूर्ण करताना अनेकदा रस्त्यालगतच्या झाडांची योग्य काळजी घेतली जात नाही. त्यामुळे हजारो झाडांचे नुकसान होत असल्याची समोर आले आहे. रस्त्याचे खोदकाम करताना योग्य खबरदारी घेतली नसल्याने अनेक ठिकाणी झाडांना धक्का लागला आहे. प्रभादेवी येथे जिवा आत्माराम राऊळ मार्ग, जुना प्रभादेवी मार्ग, वीर स्नातजी लेन, फेमस स्टुडिओ लेन या ठिकाणी महापालिकेतफे रस्ते काँक्रिटीकरणाची कामे सुरू आहेत.

त्यादरम्यान रस्त्यांवरील अनेक झाडांचे नुकसान झाले आहे. हरित लवादाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार झाडांच्या १ मीटर परिघात खोदकाम करण्यास मनाई आहे. मात्र, कंत्राटदाराने या नियमाला बगल देऊन रस्त्या लगत असलेल्या झाडांच्या मुळांचे काँक्रिटीकरण केल्यामुळे जवळपास ३५ ते ४५ झाडांना धोका निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी झाडांची मुळे कापली गेली आहेत तर अनेक ठिकाणी ती उघडी पडली आहेत. परिणामी, पावसाळ्यात झाडे उन्मळून पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. काँक्रीटीकरणादरम्यान झाडांचे नुकसान झाल्याची बाब निदर्शनास येताच संबंधित विभाग कार्यालयातील उद्यान विभागाने याबाबत पालिकेच्या रस्ते विभागाला माहिती दिली. तसेच कंत्राटदाराविरोधात कारवाई करण्याची सूचना दिली. त्यानुसार रस्ते विभागाने संबंधित कंत्राटदाराला नोटीस बजावून ५० हजार रुपये दंड ठोठावला. काही दिवसांपूर्वी प्रभादेवी येथे झाडांचे नुकसान झाल्यामुळे कंत्राटदाराला २० हजार रुपयांचा दंड ठोठावला होता.

संपादकीय...

असंस्कृतांची 'डिग्री'!...

समाजात पोलिसांविषयी 'भीती' निर्माण व्हावी यासाठी त्यांना सढळपणे हात चालवू दिला जावा असे सरासरी प्रत्येकी पाच पोलिसांतील एकास वाटते. म्हणजे अतिरेकी हिंसक मार्गांत काहीही गैर नाही, असेच साधारण २० टक्के पोलिसांचे मत.जी राज्ये अधिक प्रगत त्या राज्यांतील पोलीस हे नागरिकांचे अधिकार आणि स्वतःच्या अधिकारांच्या मर्यादा याबाबत अधिक सजग असल्याचे या पाहणीत आढळले.लोकशाही मूल्ये तळापर्यंत न झिरपलेल्या आपल्या समाजात अधिकारपदांवरील व्यक्तींविषयी नेहमीच एक असूया आढळते. हे प्रमाण समाजातील दुर्बलांमध्ये अधिक. म्हणून अशा समाजांत सर्वात अधिक प्रयत्न असतो तो अधिकार मिळवण्याचा आणि स्वतः अधिकारी होता येणार नसेल तर अधिकारी व्यक्तीचा आशीर्वाद कसा मिळवता येईल याचा. त्यात या अधिकारी व्यक्ती गणवेशधारी असतील तर ही असूया कितीतरी पट अधिक. अशा गणवेशधाऱ्यांचे अशा समाजात कोण कौतुक! हा गणवेश अंगावर असणाऱ्यांना आपल्याला इतरांपेक्षा काही विशेष अधिकार आहेत असे वाटू लागते आणि तो कथित विशेषाधिकार निर्लज्जपणे मिरवण्यात ते धन्यता मानू लागतात. वास्तविक हा गणवेश त्या व्यक्तीच्या कार्यकालाचा फक्त भाग. म्हणजे हा कार्यकाल संपला की या गणवेशातील व्यक्ती या सर्वसामान्यांइतक्याच सर्वसामान्य असायला हव्यात. पण हे फक्त खऱ्या लोकशाहीवादी देशांत घडते. अन्यत्र अनेक ठिकाणी गणवेश उतरल्यानंतरही या व्यक्तींचे अधिकारप्रदर्शन मोठ्या जोमात सुरू असते आणि अज्ञ समाज त्याचे समर्थनही करत असतो. हे समाजात खोलवर मुरलेल्या सरंजामशाही (फ्यूडल) वृत्तीचे लक्षण. ही वृत्ती कोणत्या समाजात किती रुजलेली आहे याची चाचपणी करावयाची असेल तर फक्त एका पेशातील व्यक्तींच्या मानसिकतेचा अभ्यास केला तरी पुरे. हा पेशा म्हणजे पोलीस. दिल्लीस्थित 'सेंटर फॉर द स्टडी ऑफ डेव्हलपिंग सोसायटीज' (सीएसडीएस) या विख्यात संस्थेने 'लोकनीती'तर्फे ही पाहणी केली. तिचे निष्कर्ष झोप उडवणारे आहेत.कारण सर्वेक्षणातील जवळपास निम्म्या पोलिसांना तपासासाठी हिंसेचा आधार घेण्यात काहीही गैर वाटत नाही आणि मानवाधिकार, आरोपीचे अधिकार इत्यादींबाबत आपले काही घेणेदेणे आहे असे त्यांना वाटत नाही. उलट कर्तव्य बजावताना काही 'अतिरेक' झालाच तर नंतर आम्हास चौकशीचे, शिक्षेचे भय नको असेच या पोलिसांस वाटते. आमचे अधिकार आम्हाला मुक्तपणे, कोणत्याही दडपणाशिवाय वापरू द्या, असे त्यांचे म्हणणे. अशा प्रकारची देशातील ही पहिलीच पाहणी. देशातल्या १७ राज्यांतील ७२ ठिकाणच्या एकंदर ८,२७६ इतक्या पोलीस कर्मचाऱ्यांस भेटून त्यांची मनोधारणा, त्यांचे विचार आदींचा अभ्यास या पाहणीत असून 'बिझनेस स्टॅण्डर्ड' या वृत्तपत्राने त्यावर आधारित एक साद्यंत वृत्तलेख गुरुवारी प्रकाशित केला. हा अहवाल मुळातच वाचण्यासारखा आहे. त्यात सहभागी झालेले सर्व जण हे पोलीस कर्मचारी असले तरी त्यांच्या मानसिकतेत राज्यवार फरक आढळला. जी राज्ये अधिक सुव्यवस्थित, प्रगत त्या राज्यांतील पोलीस हे नागरिकांचे अधिकार आणि स्वतःच्या अधिकारांच्या मर्यादा याबाबत अधिक सजग आढळले. म्हणजे केरळमधील जवळपास सर्वच पोलीस कर्मचाऱ्यांनी आरोपींच्या चौकशीदरम्यान होणाऱ्या हिंसाचाराविरोधात मत व्यक्त केले आणि मानवाधिकारांचे अस्तित्व, महत्त्व त्यांना मान्य होते. या उलट परिस्थिती गुजरात आणि झारखंड या राज्यांची. या दोनही राज्यांतील पोलीस सर्रास कोठडीतील हिंसाचाराचे समर्थन करताना आढळले. गुजरात हे राज्य पंतप्रधान आणि केंद्रीय गृहमंत्री यांचे. मानवाधिकारांची थोडी फार चाड त्या राज्यातील पोलिसांस आहे, असे या पाहणीत दिसले नाही. पोलिसी हिसका, चौदावे रत्न इत्यादी मार्गांचा आधार घेण्यात काहीही गैर नाही, असे त्यांस वाटते. इतकेच नव्हे तर महिलांवरील लैंगिक अत्याचारादी गुन्ह्यातील आरोपींस जमावाच्या हाती देऊन झटपट न्याय करणे हेच योग्य, असे अनेक पोलिसांचे मत. या तालिबानी रीतीत काहीही अयोग्य नाही, ही त्यांची धारणा. ती बाळगणारी प्रमुख राज्ये म्हणजे गुजरात (५७ टक्के), आंध्र प्रदेश (५१ टक्के), महाराष्ट्र (५० टक्के), तमिळनाडू (४६ टक्के) आणि ओडिशा (४२ टक्के). त्याचवेळी अशा झुंडशाहीचे कमीत कमी समर्थन केले ते केरळ (शून्य टक्के), नागालँड, पश्चिम बंगाल (दोन टक्के) या राज्यांनी. येथील पोलिसांस हा झटपट न्याय मार्ग मान्य नाही.असे काही सूक्ष्म भेद वगळले तर देशभरातील सर्वच पोलिसांत एक भावना सर्रास आढळली. ती होती अधिकाराचा अतिरेक करू देण्याची. समाजात पोलिसांविषयी 'भीती' निर्माण व्हावी यासाठी त्यांना सढळपणे हात चालवू दिला जावा असे सरासरी प्रत्येकी पाच पोलिसांतील एकास वाटते. म्हणजे अतिरेकी हिंसक मार्गांत काहीही गैर नाही, असेच साधारण २० टक्के पोलिसांचे मत. त्याचवेळी मुले पळवणारे, त्यांच्यावर अत्याचार करणारे यांना सरळ जमावाच्या तोंडी तिथल्या तिथे द्यावे असे सरासरी चतुर्थांश पोलीस कर्मचाऱ्यांस वाटते. म्हणजे; अशा गुन्ह्यांत रीतसर आरोप ठेवणे, खटला चालवणे, आरोप सिद्ध होणे आणि मग त्या आरोपीस शिक्षा सुनावली जाणे या न्याय्य आणि सर्वमान्य मार्गाच्या विरोधात सुमारे २५ टक्के पोलीस कर्मचारी आहेत. इतक्या प्रचंड प्रमाणात पोलिसांना 'झटपट न्याय' हा मार्ग रास्त वाटत असेल तर आपल्या समाजासमोर पुढे काय वाढून ठेवलेले आहे याचा विचार व्हावा. 'धोकादायक गुन्हेगार' तुरुंगात ठेवून त्यांच्यावर खटला वगैरे चालवण्यापेक्षा त्यांना ठार करणे इष्ट, असेच या पोलिसांस वाटत असेल तर अशा समाजात असे वागणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांस 'एन्काउंटर स्पेशालिस्ट' म्हणून गौरवले जाणे क्रमप्राप्तच म्हणायचे. ज्या गावच्या बोरी, त्याच गावच्या बाभळी! आपल्या अधिकाराचे योग्य निर्वहन करण्यासाठी प्रसंगी हिंसक मार्गाचा मुक्त वापर करण्याची मुभा जवळपास या सर्व पोलीस कर्मचाऱ्यांस हवी आहे. तथापि त्यांचे अधिकारी मात्र मानवाधिकारादी मुद्द्यांबाबत सजग असल्याचे या पाहणीत आढळले, ही त्यातल्या त्यात समाधानाची बाब. अर्थात या मानवाधिकारांचा आदर केला जावा असे त्यांस प्रामाणिकपणे वाटते की हे मत त्यांचे केवळ पाहणीतील चातुर्य होते/आहे हे कळण्यास मार्ग नाही. कारण अधिकाऱ्यांस 'एन्काउंटर' मार्ग नको असेल तर कर्मचाऱ्यांकडून त्याचा अवलंब केला जाणे अशक्य.आपल्या केंद्रीय मानवाधिकार आयोगाकडील तपशिलानुसार २०१६ पासूनच्या सहा वर्षांत दर तीन दिवसाला एक इतक्या गतीने एन्काउंटर हत्या आपल्या देशात नोंदल्या गेल्या. ही संख्या ८१३ इतकी आहे. कहर म्हणजे हे ८१३ मृत्यू हे एकप्रकारे खून/हत्याच असून त्यासाठी शिक्षा झाल्याचे आपल्याकडे एकही उदाहरण नाही. गणवेशातील हिंसाचार माफ असा त्याचा अथ. 'या खेरीज पोलीस कोठडीत मरण पावलेले वेगळे. खरे तर 'एन्काउंटर किलिंग' हा तिसऱ्या जगातील फक्त दोन देशांत सर्रास होणारा शब्दप्रयोग. हे दोन देश म्हणजे अर्थातच भारत आणि दुसरा पाकिस्तान. अमेरिकेत दोन वर्षांपूर्वी अशी हत्या एका पोलीस अधिकाऱ्याकडून झाली असता त्यास रीतसर शासन झाले. पण आपल्याकडे असे पोलीस अधिकारी सहज मिरवले जातात आणि सत्ताधीश अशा 'धाडसी' पोलिसांच्या 'धडाडी'चे तसेच या मार्गाचे उलट कौतुक करतात. काही महिन्यांपूर्वी बदलापूर लैंगिक गुन्ह्यातील आरोपीची पोलिसांच्या ताब्यात असताना झालेली हत्या, हे त्याचे ताजे उदाहरण. त्यावेळी मुख्यमंत्र्यांसह सत्ताधारी पक्षाच्या अनेक राजकारण्यांनी या हत्येचे समर्थन केले. त्यानंतर आता राज्याच्या राजकारणात मराठवाड्यातील पोलिसी हत्या हा वादाचा विषय. ही 'लोकनीती' पाहणी हेच वास्तव अधोरेखित करते. आज हा पाहणी अहवाल प्रसृत होत असताना देवेंद्र फडणवीस सरकारातील मंत्री शंभूराज देसाई हे कुणाल कामरा याला 'थर्ड डिग्री' देऊ असे सहज म्हणतात. ही असंस्कृतांची 'डिग्री' आपल्या समाजास कोठे घेऊ जाईल याचा विचार आपण करणार की नाही; हा प्रश्न.

!!! चौदाव्या वर्षी 'बुधभूषण' ग्रंथ लेखन !!!

(२९ मार्चः छत्रपती संभाजी महाराज पुण्यस्मरण सप्ताह)

स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची आज पुण्यतिथी आहे. अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोऊन उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांबद्दल काही सत्य गोष्टी श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींच्या संकलित लेखातून जाणून घेऊया...संपादक.

स्वराज्यरक्षक, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांची आज पुण्यतिथी आहे. छत्रपती संभाजी महाराजांची संपूर्ण कारकीर्द तेजोमय होती. अगदी लहान असल्यापासून त्यांच्यावर अनेक संकटे आली. त्या संकटांवर पाय रोऊन उभे न राहता संभाजी महाराजांनी समर्थपणे झेपही घेतली. छत्रपती शिवाजी महाराजांनंतर स्वराज्याची धुरा सक्षमपणे आपल्या हातात घेऊन संपूर्ण हिंदुस्थानाला तोंडात बोटे घालायला लावणारा प्रचंड पराक्रम संभाजी महारांजी केला. छत्रपती शिवाजी महाराजांबरोबर किंवा त्यानंतरही अनेक मोहिमा संभाजी राजेंनी यशस्वीपणे राबवल्या. कोणत्याही मोहिमेत त्यांना कधीच अपयश आले नाही. छत्रपती संभाजी महाराजांना टक्कर देईल, असा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता. संभाजी राजे हे असामान्य व्यक्तिमत्त्व होते. अचाट धैर्य, अजोड पराक्रम, असमान्य शौर्य, प्रयत्नांची पराकाष्ठा, अनेक भाषांवर प्रभुत्व, संस्कृत पंडित, धर्माभिमानी, व्यासंगी, आदर्श महावीर, समाजकारण, राजकारण, अर्थकारण, धर्मकारण अशा अनेक क्षेत्रात आपले निर्विवाद वर्चस्व गाजवणाऱ्या छत्रपती संभाजी महाराजांबद्दल काही गोष्टी आपल्याला माहित असायलाच हव्यात.



संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी.
रामनगर वॉर्ड, गडचिरोली.
फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

संभाजी राजेंचे बालपणः संभाजी राजांचा जन्म दि.१४ मे १६५७ रोजी किल्ले पुरंदर येथे झाला. युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराजांना पुत्ररत्न झाले. शिवाजी महाराजांचे संभाजी राजेंवर अपार प्रेम होते. नशीबाचे दशावतार संभाजी महाराजांनी अगदी लहानपणापासूनच भोगले. संभाजी राजे दोन वर्षांचे असताना सईबाईंचे अकाली निधन झाले. त्यानंतर त्यांचा सांभाळ राजमाता जिजाऊंनी केला. केशवभट आणि उमाजी पंडित यांनी संभाजी राजेंना उत्तम शिक्षण दिले. सुरुवातीच्या काळात त्यांची सावत्र आई सोयराबाई यांनीही त्यांच्यावर खूप माया केली. अनेक ऐतिहासिक नोंदींप्रमाणे संभाजीराजे अत्यंत देखणे आणि शूर होते. लहान असल्यापासूनच संभाजी महाराजांनी राजकारणातील डावपेच, गनिमी कावा अगदी भराभर आत्मसात केला.

नवव्या वर्षी आग्रा मोहीमः छत्रपती शिवाजी महाराज आग्रा मोहिमेवर गेले असताना त्यांनी संभाजी राजेंनाही सोबत घेतले होते. त्यावेळी संभाजी राजे अवघ्या नऊ वर्षांचे होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक गोष्टी त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. शिवाजी महाराज आग्र्याहून सुटल्यानंतर त्यांनी संभाजी महाराजांना मथुरेत ठेवले होते. संभाजी राजेंवर सुरक्षित स्वराज्यात आणण्यासाठी संभाजी राजेंचे निधन झाल्याची अफवा महाराजांनी पसरवून दिली. त्यानंतर २० नोव्हेंबर १६६६ रोजी अगदी सुखरूपपणे ते पुन्हा राजगडास पोहोचले. आग्र्याहून रायगडावर पुन्हा परत येताना संभाजी राजेंनी केलेल्या बुद्धिचातुर्याच्या अनेक कथा प्रसिद्ध आहेत.



चौदाव्या वर्षी बुधभूषण ग्रंथः छत्रपती संभाजी महाराजांनी दिलेल्या काही दानपत्रावरून त्यांच्या संस्कृत ज्ञानाविषयी माहिती मिळते. संभाजी राजेंनी वयाच्या अवघ्या चौदाव्या वर्षी बुधभूषण हा ग्रंथ लिहिला. हीच गोष्ट स्वराज्यविरोधक नीच कपटी ब्राह्मणवर्गास सलत होती. बहुजनसमाजातील व्यक्तीने लेखनवाचन करू नये, केल्यास देहदंडाची शिक्षा द्यावी, असा त्यांचा दंडकारण्य होता. तरीही संभाजींनी तीन भागांतील बुधभूषण या ग्रंथात काव्यालंकार, शास्त्रे, संगीत, पुराणे, धनुर्विद्या यांचा अभ्यास केल्याचा उल्लेख आहे. तसेच राजा आणि त्याचे गुण, राजाचे मदतनीस, राजाचे सल्लगार, राजाची कर्तव्ये, राजसभा, मुख्य प्रधान राजपुत्र, त्यांचे शिक्षण, त्यांची कर्तव्ये, कोश, दुर्ग, सैन्य, हेर, नोकर, वगैरेंची माहिती दिली आहे. याशिवाय गागाभट्टांकडून नीतिपर 'समयनय' हा ग्रंथ संभाजी राजेंनी लिहून घेतला. 'धर्म कल्पलता' हा धर्मशास्त्रावरील ग्रंथ केशव पंडिताने संभाजीराजांसाठी लिहिला. युद्धकलेतील नैपुण्याबद्दल ?बे कॅरे या परकीय लेखकाने संभाजी महाराजांची प्रशंसा केली आहे. यावरून संभाजी महाराजांच्या अफाट बुद्धी, ज्ञान, अनेक भाषांवरील प्रभुत्व, धर्माभिमान याचा अंदाज लावता येऊ शकतो.

?कुशल संघटकः छत्रपती संभाजी महाराज हे राज्यकारभारातही अत्यंत निपूण होते. ते कुशल संघटक होते. छत्रपती शिवाजी महाराजांप्रमाणे पुढे छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांनीही अष्टप्रधान मंडळाची नियुक्ती केली होती. यामध्ये पंतप्रधान म्हणून निळोपंत पिंगळे, चिटणीस म्हणून बाळाजी आवजी, सेनापती म्हणून हंबीरराव मोहिते, न्यायाधीश म्हणून प्रल्हाद निराजी, पंत सुमंत म्हणून जनार्दन पंत, पंडितराव दानाध्यक्ष म्हणून मोरेश्वर पंडितराव, पंत सचिव म्हणून आबाजी सोनदेव, पंत अमात्य म्हणून दत्ताजी पंत, पंत अमात्य म्हणून अण्णाजी दत्तो यांची नियुक्ती करण्यात आली होती.

'श्री शंभोः शिवजातस्य मुद्राद्यौरिव राजते।
यदं कसेविनी लेखा वर्तते कस्यनोपरि।।'

अशी छत्रपती झाल्यावर संभाजी महाराजांची मुद्रा होती.

?अजिंक्य संभाजी राजेः छत्रपती संभाजी महाराज यांनी आपल्या पराक्रमाच्याजोरावर अल्प काळात मराठा साम्राज्याच्या विस्तार आणि बचाव केला. मराठा साम्राज्याच्या १५ पट असणाऱ्या मुघल साम्राज्याशी संभाजी महाराजांनी एकहाती लढा दिला. संभाजी महाराजांनी गनिमी कावा पुरेपूर वापरत औरंगजेबाला पुरते जेरीस आणले होते. संभाजी राजेंनी आपल्या कार्यकाळात एकूण १२० युद्धे लढली. महत्वाचे म्हणजे संभाजी महाराजांना १२० पैकी एकही लढाईत अपयश आले नाही. असा पराक्रम करणारे छत्रपती संभाजी महाराज हे एकमेव योद्धा होते. संभाजी राजांना टक्कर देणारा योद्धा तत्कालीन हिंदुस्थानात नव्हता.

?बुऱ्हाणपूर आणि रामशेजः छत्रपती शिवरायांनंतर शंभूराजे छत्रपती झाले. संभाजी महाराजांनी सरसेनापती म्हणून हंबीरराव मोहिते यांची नियुक्ती केली. सरनौबत हंबीरराव मोहिते यांनी अचानक बुऱ्हाणपूरवर हल्ला केला. मोठ्या फौजफाट्यासह मराठी सैन्य ७० मैलाची मजल मारून एकाएकी बुऱ्हाणपुरावर चालून गेले. तीन दिवसापर्यंत मराठे लुट करत होते. जडजवाहीर, सोने-नाणे, रत्ने आणि मौल्यवान सामान घेतले. इतर जिन्नसाकडे त्यांनी लक्षही दिले नाही. भांडीकुंडी, काचेचे सामान, धान्य, मसाले, वापरलेली वस्त्रे आदी सर्व लूट वाहून नेणे शक्य नसल्यामुळे तेथेच टाकून मराठ्यांचे सैन्य निघून गेले. संभाजी महाराजांच्या दराऱ्यामुळे पुढील काही महिने त्या वस्तूला हात लावायची कुणाची हिंमत झाली नाही, अशी आख्यायिका आहे. शहाबुद्दीन फिरोजजंगने रामशेज किल्ल्यावर चाल करून गेला. हा किल्ला सहज हस्तगत करता येईल, अशी मोघलांचा समज होता. मात्र, संभाजी महाराजांनी या किल्ल्यावर रसद पोहोचवण्यासाठी खास तुकडी तैनात केली. मराठ्यांनी कडवी झुंज देत हा किल्ला ५ वर्षे झुंजवत ठेवला होता.

?उदार धार्मिक लोकनीतिः छत्रपती शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण संभाजी राजेंनी पुढे चालू ठेवले. अनेक देवस्थाने, मठ, सत्पुरुष यांना वार्षिक नेमणुका पूर्ववत करून दिल्या. संभाजी महाराजांनी संत तुकारामांचा मुलगा महादोबा यास वर्षासन दिले. तसेच मौनी गोसावी, गणीराम, वासुदेव गोसावी, कऱ्हाडचे वेदशास्त्री नरसीभट शेषभट मुंज्येमणी, कांदळगावचे अनंत भट, महादेव भट, महाबळेश्वरचे वेदमूर्ती रामभट, कऱ्हाडचेच शिवभट नीलकंठभट अग्निहोत्री, पावसचे हरिभट पटवर्धन, रामचंद्र केशवभट पंडित, निंब येथील सदानंद मठाचे अनंतगिरी गोसावी यांना सढळ हस्ते मदत केली. त्यांच्या व्यवस्था लावल्या. संभाजीराजांनी चिंचवड, मोरगाव, सज्जनगड, चाफळ, शिंगणवाडी, महाबळेश्वर इ. देवस्थानांचे व्यवस्थापन योग्य पद्धतीने चालावे, यासाठी पूर्वीची वृत्ती, इनामे व सनदा पूर्ववत केल्या. एकूण धार्मिक कारभाराकडे ते जातीने लक्ष घालत असत, हे तत्कालीन पत्रव्यवहारांतून दिसते.

?हौतात्म्यामुळे अजरामर झालेले पराक्रमी पुरुषः सन १६८९ च्या सुरवातीला छत्रपती संभाजी राजेंचा मेहुणा गणोजी शिर्के आणि औरंगजेबाचा सरदार मुकर्रबखान यांनी संगमेश्वरवर हल्ला केला. मराठ्यांत आणि शत्रूसैन्यात चकमक झाली. मराठ्यांचे संख्याबळ कमी होते. प्रयत?नांची शर्थ करूनही मराठे शत्रूचा हल्ला परतवून लावू शकले नाहीत. परिणामी संभाजी महाराजांना जिवंत पकडण्यात मोघलांना यश आले. संभाजीराजे आणि कवी कलश यांना औरंगजेबापुढे बहादुरगड येथे नेले. बालविद्येचे ठेकेदार कपटी ब्राह्मणवर्गाने औरंग्याशी हातमिळवणी केली व संभाजींना देह यातना देत मारावे, असा निर्वाणीचा सल्ला त्यास दिला. त्याप्रमाणे संभाजीराजांनी धर्मांतर केल्यास जीवदान देण्याची अट औरंगजेबाने घातली होती. मात्र, संभाजी राजेंनी त्याला स्पष्टपणे नकार दिला. औरंगजेबाचे अनन्वित अत्याचार छळ जसे कानानाकात तप्त शिसे ओतले, जिभ छाटली, अवयव तोडले व शेवटी शिरच्छेद केला. हे असह्य होऊन सुमारे ४० दिवसांनी फाल्गुन अमावास्या म्हणजेच यंदाच्या वर्षीप्रमाणे दि. २९ मार्च १६८९ रोजी संभाजी महाराजांची प्राणज्योत अखेर मालवली. दुसऱ्याच दिवशी म्हणजेच गुडी पाडव्याच्या दिवशी द्वेषी ब्राह्मणांसहीत मोघलांनी राजांचे मुंडके बांबूत खोचून गावभर उत्साहात मिरवणूक काढली. तेव्हापासून ही परंपरा बांबूवर गढवे उपडे ठेवून गुढी उभारण्यास सुरूवात झाली. असह्य यातना सहन करूनही संभाजीराजांनी स्वराज्यनिष्ठा आणि धर्मनिष्ठा सोडली नाही. म्हणून त्यांना अखंड भारतवर्षाने धर्मवीर हे पदवी बहाल केली. बहुजनवर्ग ही परंपरा आजही उत्साहात चालवीत आहे. शुभचिन्ह व शुभमुहूर्त म्हणून माझ्या राजाच्या हालहालकडे डोळेझाक करत आहे.

साठी...

परतीचे लागले वेध
उलटून जाता साठी
तसबीर काढून ठेवी
रे हार घालण्यासाठी

सोबत हवी विचारते
थरथर करता काठी
प्रवास असह्य आता
बोलते गुढग्या वाटी

कधीही बदलू शकते
दारा वरली ती पाटी
पुढला अध्याय चालो
नवा दांडी नवी विटी

कुठल्यावळणावरती
तो रेड्यावरचा गाठी
संपली इथली शाळा
कधींही होणारं सुट्टी

बांधा बांधी करायची
रे गाडी मारते शिट्टी
उरलेले दिवस किती
अस्पष्ट जाणे ललाटी

वेदना हव्या कशाला
अशीच ही जगरहाटी
प्रभूचे नाम स्मरण ते
अंतसमयी यावेओठी

-हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

मोबाईलवाले ..

भरगच्च ती
रहदारी
मोबाईल लावे काना
बाईक वाले चालले
वाकड्या करी माना

कुणी बोले बाष्कळ
कुणी ऐकतोयं गाना
मृत्यू फिरे रस्त्यावर
रे कधी येणारं भाना

हेडफोन गुंडाळलेला
युक्त्या करता नाना
गुंगून जातात असले
जणूं बसले ते ध्याना

मोबाईलले थोडातरी
विश्राम कधी द्या ना
चोवीसतास कार्यरत
विश्रांती शांती घ्याना

सगळे कसे बिनधास्त
का भिती नाही मना
सुरात मिसळून बेसूर
कुणी मारत राहे ताना

ट्रॅफिक रुल ऐसीतैसी
झकास लावला चुना
दंड भरु हसत हसत
रे गुन्हा करतात पुन्हा

- हेमंत मुसरीफ पुणे
९७३०३०६९९६..

पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ३० मार्च रोजी महाराष्ट्र आणि छत्तीसगढला देणार भेट

नागपूर ■ दिलीप येवले

पंतप्रधान नागपूर मधील स्मृती मंदिर येथे दर्शन घेणार; पंतप्रधान नागपूर मध्ये दीक्षाभूमी येथे भेट देऊन डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहणार; पंतप्रधान नागपूर मध्ये माधव नेत्रालय प्रीमिअम केंद्राची पायाभरणी करणार; नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड येथे लॉइटरिंग युद्धपयोगी सामग्री चाचणी तळ आणि यूएव्हीसाठी धावपट्टी सुविधेचे पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन होणार;पंतप्रधानांच्या हस्ते बिलासपूर येथे सुमारे ३३,७०० कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विविध विकासकामांची पायाभरणी, कार्याचा शुभारंभ आणि राष्ट्रार्पण होणार; छत्तीसगड मध्ये ऊर्जेची उपलब्धता वाढवण्यासाठी आणि ग्रीडच्या मजबुतीच्या उद्देशाने विविध ऊर्जा निर्मिती आणि पारेषण प्रकल्प हाती घेतले जाणार आहेत. छत्तीसगड मध्ये विशेषतः आदिवासी आणि औद्योगिक वसाहतीत संपर्कव्यवस्था वाढवण्याच्या दृष्टीने बहुविध रेल्वे आणि रस्ते प्रकल्पांच्या विकासावर विशेष लक्ष केंद्रित केले जाईल. या भागातील शिक्षण क्षेत्राशी निगडित पायाभूत सुविधांना मोठी चालना देण्यासाठी पंतप्रधान छत्तीसगड मधील २९ जिल्ह्यांमध्ये १३० पी एम श्री शाळांचे लोकार्पण करणार. सर्वांसाठी घरे या दृष्टिकोनानुसार छत्तीसगडमध्ये होणार प्रधानमंत्री आवास योजना - ग्रामीण (पीएमएवाय -जी) अंतर्गत ३ लाख लाभार्थ्यांचा गृहप्रवेश.



नागपूर : पंतप्रधान नरेंद्र मोदी येत्या ३० मार्च रोजी महाराष्ट्र आणि छत्तीसगढला भेट देणार आहेत. या दौऱ्यात ते सर्वप्रथम नागपूरला जातील आणि सकाळी ९ वाजता स्मृती मंदिर येथे दर्शन घेऊन त्यानंतर दीक्षाभूमीला भेट देतील.

साधारण दहा वाजण्याच्या सुमारास पंतप्रधानांच्या हस्ते नागपूर मध्ये माधव नेत्रालय प्रीमिअम केंद्राची पायाभरणी होणार असून त्यानंतर ते एका जाहीर सभेला संबोधित करणार आहेत.

त्यानंतर दुपारी १२:३० वाजता, ते नागपूरमधील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेड येथे लॉइटरिंग युद्धपयोगी सामग्री चाचणी तळ आणि यूएव्हीसाठी धावपट्टी सुविधेचे उद्घाटन करतील.

त्यानंतर पंतप्रधान बिलासपूरला जाणार असून साधारण दुपारी साडे तीन च्या सुमारास त्यांच्या हस्ते सुमारे ३३,७०० कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या विविध विकासकामांची पायाभरणी, कार्याचा शुभारंभ आणि राष्ट्रार्पण होणार आहे. ते एका जाहीर सभेला देखील संबोधित करतील.

पंतप्रधानांचा महाराष्ट्र दौरा

हिंदू नववर्षानिमित्त होणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रतिपदा कार्यक्रमाचे औचित्य साधत पंतप्रधान नरेंद्र मोदी स्मृती मंदिर येथे दर्शन घेतील आणि आर एस एस च्या संस्थापकांना आदरांजली वाहतील. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या हजारो अनुयायांसह १९५६ मध्ये ज्या ठिकाणी बौद्ध धर्म स्वीकारला होता, त्या दीक्षाभूमीला भेट देऊन पंतप्रधान आदरांजली वाहतील.

पंतप्रधान माधव नेत्रालय नेत्र चिकित्सा आणि संशोधन केंद्राच्या नवीन विस्तारित इमारतीची म्हणजे माधव नेत्रालय प्रीमियम सेंटरची पायाभरणी करतील. २०१४ मध्ये स्थापन झालेले हे नेत्रालय नागपूरमधील एक प्रमुख सुपर-स्पेशालिटी नेत्ररोग सेवा सुविधा केंद्र आहे. गुरुजी माधवराव सदाशिवराव गोळवलकर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ ही संस्था स्थापन करण्यात आली. आगामी प्रकल्पात २५० खाटांचे रुग्णालय, १४ बाह्यरुग्ण विभाग (ध्झ्३) आणि १४ मॉड्यूलर ऑपरेशन थिएटर असतील. सर्वसामान्यांना परवडणाऱ्या आणि जागतिक दर्जाच्या नेत्ररोग संबंधित सेवा प्रदान करणे आहे, हा यामागील उद्देश आहे.

पंतप्रधान नागपुरातील सोलर डिफेन्स अँड एरोस्पेस लिमिटेडच्या दारूगोळा केंद्राला भेट देणार आहेत. निःशस्त्र हवाई वाहनांसाठी (ळँँ=) नव्याने बांधण्यात आलेल्या १२५० मीटर लांब आणि २५ मीटर रुंद हवाई पट्टीचे आणि लोइटरिंग युद्धसामग्री आणि इतर मार्गदर्शित युद्धसामग्रीची चाचणी घेण्यासाठी प्रत्यक्ष युद्धसामग्री आणि वॉरहेड चाचणी सुविधेचे उद्घाटन करतील.

पंतप्रधानांचा छत्तीसगड दौरा

पायाभूत सेवासुविधा आणि शाश्वत उपजीविका वाढवण्याच्या आपल्या वचनबद्धतेनुसार पंतप्रधान बिलासपूर येथे ऊर्जा, तेल आणि गॅस, रेल्वे, रस्ते, शिक्षण आणि गृहनिर्माण क्षेत्रांशी संबंधित ३३,७०० कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या अनेक विकास प्रकल्पांचे उद्घाटन, पायाभरणी आणि राष्ट्रार्पण करणार आहेत.

देशभरातील वीज क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी पंतप्रधान वचनबद्ध आहेत. या अनुषंगाने, किफायतशीर आणि विश्वासार्ह विद्युत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आणि छत्तीसगडला वीज निर्मितीत स्वयंपूर्ण करण्यासाठी अनेक पावले उचलली जाणार आहे. ते ९,७९० कोटी रुपयांपेक्षा जास्त किंमत असलेल्या बिलासपूर जिल्ह्यातील एनटीपीसीच्या सिपत सुपर थर्मल पॉवर प्रोजेक्ट टप्पा-छछ (१ ८०० मेगावॅट) ची पायाभरणी करतील. हा पिट हेड प्रकल्प उच्च वीज निर्मिती कार्यक्षमतेसह अत्याधुनिक अल्ट्रा-सुपरक्रिटिकल तंत्रज्ञानावर आधारित आहे. छत्तीसगड राज्य ऊर्जा निर्मिती कंपनी लिमिटेडच्या १५,८०० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या पहिल्या सुपर क्रिटिकल थर्मल पॉवर प्रोजेक्टच्या (२ ६६० शे) कामाचा शुभारंभ ते करतील. ते पश्चिम क्षेत्र विस्तार योजनेअंतर्गत पॉवरग्रीडचे ५६० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या तीन वीज पारेषण प्रकल्पांचे राष्ट्रार्पण करतील.

भारताच्या शून्य उत्सर्जन उद्दिष्टांच्या अनुषंगाने तसेच वायू प्रदूषण कमी करणे आणि स्वच्छ ऊर्जा उपाय प्रदान करणे यासाठी पंतप्रधान मोदी हे छत्तीसगडमधल्या कोरिया जिल्ह्यात तसेच सूरजपूर, बलरामपूर आणि सरगुजा जिल्ह्यांमध्ये भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या (बीपीसीएल) सिटी गॅस वितरण प्रकल्पाची पायाभरणी करतील. यामध्ये २०० किमी पेक्षा जास्त उच्च दाबाची पाइपलाइन आणि ८०० किमी पेक्षा जास्त एमडीपीई (मध्यम घनता पॉलिथिलीन) पाइपलाइन आणि १,२५८ कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीचे अनेक सीएनजी वितरण आउटलेट समाविष्ट आहेत. ते २२१० कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या हिंदुस्तान पेट्रोलियम कॉर्पोरेशन लिमिटेडच्या(एचपीसीएल) ५४० किमी लांबीच्या विशाख-रायपूर पाईपलाईन प्रकल्पाची पायाभरणीदे

संजिवनी ममता हॉस्पिटलतर्फे मोफत मेगा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

रिसोड ■ प्रतिनिधी

रिसोड : संजिवनी ममता हॉस्पिटल आणि रिसर्च सेंटरतर्फे नागरिकांसाठी ५ व ६ एप्रिल रोजी मोफत मेगा आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.सदर शिबीर उत्तमचंदबगडिया कला व वाणिज्य महाविद्यालय, रिसोड येथे सकाळी १० ते संध्याकाळी ५ वाजेपर्यंत चालणार आहे. या शिबिरात विविध तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत तपासणी व मार्गदर्शन मिळणार आहे.

शिबिरामध्ये प्रामुख्याने सर्व प्रकारचे कर्करोग म्हणजेच कॅन्सर, गुडघ्यांचे व खुब्याचे प्रत्यारोपण म्हणजेच नी व हीप जॉईंट रिप्लेसमेंट, मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्या जातील.

सर्वप्रकारचे कॅन्सर मध्ये जसे की, स्त्रियांच्या स्तनाचा कर्करोग म्हणजेच ब्रेस्ट कॅन्सर, प्रगत अख आधारित थर्मल मेमोग्राफी, स्त्रियांच्या गर्भाशयाचा कर्करोग म्हणजेच सर्वाइकल कॅन्सर मध्ये स्त्रियांच्या स्त्रावाचे ज्ञे सी द्वारे परीक्षण करण्यात येईल. मुख कर्करोग म्हणजेच तोंडाचा कॅन्सर रुग्णाचे अत्याधुनिक डेंटल व्हॅन मध्ये स्क्रीनिंग द्वारे परीक्षण करण्यात येईल. फुप्फुसाचा कर्करोग म्हणजे लंग कॅन्सर,घशाचा कॅन्सर,अन्ननलिकेचा कॅन्सर, शरीरावर नवीन गाठ येणे,गुदद्वाराचा कॅन्सर व इतर सर्व प्रकारचे कॅन्सर आजारांचे निदान व उपचार करण्यात येतील. .गुडघ्याचे व खुब्याचे आजार म्हणजेच नी व हिप जॉईंट

गुडघ्याचे व खोब्याचे जॉईंट्सच्या आजारांचे तज्ञांद्वारे निशुल्क निदान व मुंबई येथे निशुल्क ऊपचार म्हणजेच प्रत्यारोपण करण्यात येईल.

गुडघ्यांमध्ये अथवा खुब्यामध्ये किंवा आसपासच्या भागात लक्षणीय वेदना असल्यास, कडकपणा असल्यास, सूज येत असल्यास व हालचाल होत नसल्यास,एका पायावर उभे राहण्यास अडचण येत असल्यास, चालताना लंगडेपणा जाणवत असल्यास रुग्णांनी तपासणी करून या शिबिराचा लाभ घ्यावा. शिबिरामध्ये निदान झालेल्या रुग्णांचे उपचार संजीवनी ममता आणि मधुसूदन अग्रवाल हॉस्पिटल व रिसर्च सेंटर मुंबई येथील प्रसिद्ध तज्ञ डॉक्टरांद्वारे करण्यात येणार आहेत.

ममता व मधुसूदन अग्रवाल फाउंडेशन अंतर्गत संजीवनी ममता हॉस्पिटल व रिसर्च सेंटर तर्फे रिसोड शहरामध्ये आतापर्यन्त मेगा २४ आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले असून या मध्ये विविध आजारावर असलेल्या ७६५६ रुग्णांची तपासणी करून ३५१४ रुग्णांवर यशस्वी उपचार करण्यात आले आहेत. श्री पुरुषोत्तमजी अग्रवाल,श्री मधूसुधनजी अग्रवाल व श्री मन्नालालजी अग्रवाल हे बंधु स्थानिक रिसोड चे असून आपल्या मातृभूमीचे ऋण म्हणून ते रिसोडकरांची वेगवेगळ्या माध्यमातून सेवा करीत असतात. सामाजिक धार्मिक, आरोग्य व शिक्षण क्षेत्रामध्ये या तिन्ही बंधूंचे मोठे योगदान असून कोविड काळात संपूर्ण रिसोड तालुक्यातील नागरिकांचे निशुल्क लसीकरण करून नागरिकांना जीवदान दिल्याने रिसोडकर यांच्याकडे संकटमोचक म्हणूनच बघतात. श्री मधुसूदनजी अग्रवाल यांनी मागील आपले मोठे बंधू पुरुषोत्तमजी अग्रवाल यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त चार मेगा रोगनिदान शिबिराचे आयोजन केले होते त्याचा बहुसंख्य रिसोडकरांनी लाभ घेतला. मधुसूदनजी अग्रवाल यांनी हे २०२५ वर्ष रिसोड करांच्या आरोग्यासाठी समर्पित केले असून फाउंडेशन च्या वतीने रिसोड शहरात लवकरच बगडिया कॉम्प्लेक्स,गुजरी चौक रिसोड येथे समता सर्वस्व आरोग्य सेवा डायग्नोस्टिक सेंटर सुरु करणार असून ग्रामीण भागातील गरजू जनतेसाठी टेलीमेडिसिन सेवा उपलब्ध असणार आहे.यामध्ये विविध रोगाच्या तज्ज्ञ डॉक्टरांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

शिबिरात मोफत औषधे, वेदनाशामक उपचार, मल्टीव्हिटॅमिन्स व ब्लड चेकअपसुद्धा केले जाणार आहेत. तसेच उपस्थितांना मोफत पौष्टिक आहार दिला जाणार आहे.आपले आरोग्य, आमची प्राथमिकता असून तुमच्या व कुटुंबाच्या आरोग्यासाठी ही सुवर्णसंधी असून, आरोग्य तपासणीसाठी अधिकाधिक नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन ममता आणि मधुसूदन अग्रवाल फाउंडेशनचे अध्यक्ष श्री मधुसूदनजी अग्रवाल यांनी केले आहे.

अपंगत्वावर मात करत प्रविण महाजन यांचा बॉडीबिल्डींग स्पर्धेत भारतातून दुसरा क्रमांक

हजारोंसाठी ठरले प्रेरणास्त्रोत : दक्षता फिटनेस क्लबच्या वतीने गौरव

वाशिम ■ प्रतिनिधी



वाशिम : अपंगत्व ही मर्यादा नाही, तर ती संधी असल्याचे सिद्ध करत वाशिम शहरातील प्रवीण मुकेशकुमार महाजन यांनी बॉडी-बिल्डिंग क्षेत्रात मोठे यश मिळवले आहे. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सुराळा येथे शिक्षक म्हणून कार्यरत असलेले महाजन सर यांनी शिर्डी येथे झालेल्या इंडियन बॉडी-बिल्डिंग अ?ण्ड फिटनेस फेडरेशनच्या राष्ट्रीय बॉडीबिल्डींग स्पर्धेत संपुर्ण भारतातून द्वितीय क्रमांक पटकावून रौप्य पदक मिळवले. त्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल दक्षता फिटनेस क्लबच्या वतीने गुरुवार, २७ मार्च त्यांचा सत्कार करण्यात आला.

ही प्रतिष्ठित स्पर्धा २५ मार्च रोजी शिर्डी येथे पार पडली. यंदा या स्पर्धेचे ६२ वे वर्ष होते. पोलिओमुळे ४७ टक्के अपंगत्व असूनही ४३ वर्षांच्या वयातही जिद्द आणि मेहनतीच्या जोरावर बॉडी-बिल्डिंगचा छंद जोपासत महाजन यांनी हे यश मिळवले आहे. कठीण परिस्थितीवर मात करत प्रवीण महाजन यांनी मिळवलेले यश अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या प्रवासात आंतरराष्ट्रीय खेळाडू व वाशिम पोलीस प्रदीप पाटील यांचे मार्गदर्शन त्यांना लाभले. त्यांच्या संघर्षमय प्रवासाने नवोदित खेळाडूंना नवी ऊर्जा दिली असून, अपंगत्वावर मात करून स्वप्नं साकारली जाऊ शकतात, हे त्यांनी सिद्ध केले आहे.

समर्थ चषक क्रिकेट स्पर्धेला रसिक प्रेषकांचा उत्तम प्रतिसाद

दै, जनप्रभात उरण ता.प्रतिनिधी
विठ्ठल ममताबादे



उरण : समर्थ चषक ही क्रिकेटची स्पर्धा नऊ वर्षे झाली आहे.यंदाचे १० वे वर्ष आहे.क्रिकेट खेळाडू आणि प्रेक्षक यांच्या मागणीमुळे ही स्पर्धा होत आहे.कारण कोरोनाकालामुळे ही स्पर्धा बंद करण्यात आली होती.दिनांक २६ मार्च २०२५ रोजी सुरु झालेली ही स्पर्धा ३० मार्च २०२५ पर्यंत चालू राहील.स्पर्धेतून चांगले खेळाडू निर्माण व्हावेत. त्यांना मोठ्या स्पर्धा खेळण्याचा अनुभव मिळावा ह्यासाठी हे स्पर्धा ठेवण्यात आले आहेत.कारण १२ वर्षाच्या अगोदर येथे १ लाखाच्या स्पर्धा होत नसत आणि ही १ लाखाची स्पर्धा उरण पूर्वविभागात प्रथमच समर्थ चषक स्पर्धे द्वारे आयोजित करण्यात आली.या स्पर्धेला सर्वच स्तरातून उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचे मत स्पर्धेच्या प्रसंगी भाजप तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड यांनी व्यक्त केले.या स्पर्धेसाठी आयोजक भारतीय जनता पार्टीचे तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड,माजी जिल्हा परिषद सदस्य भाई जीवन गावंड,दिघाटीचे माजी सरपंच अमित पाटील,समीर पाटील,भार्गव म्हात्रे,संदीप गावंड,निलेश पाटील,महेश गावंड,नितीन म्हात्रे,अजित जोशी,गजानन गावंड,कल्पेश गावंड,नरेंद्रगावंड,पंकज गावंड, जितेंद्र गावंड,के.वाय.गावंड माजी सरपंच,प्रमोद म्हात्रे प्राध्यापक,रवी म्हात्रे,पी.के. पाटील,विशाल गावंड,प्रिंस गावंड,आमिष गावंड,नवीन गावंड,अनाधी गावंड आणि उरण तालुक्यातील,पंच क्रोशीतील तील प्रेषक,आजी माजी खेळाडू ,श्री.गणेश महिला मंडळ,गावंड कुटुंब यांनी भरपूर मेहनत घेत आहेत.ह्या सर्वांचे एकच उद्दीष्ट आहे ही स्पर्धा यशस्वी व्हावी.यासाठी सर्वच मान्यवर प्रयत्नशील आहेत. उत्तम आयोजन व नियोजन असल्यामुळे स्पर्धेच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात गर्दी होत आहे.

जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पथकांच्या भेटीनंतरही सावळी सदोबा प्राथमिक आरोग्य केंद्राची परिस्थिती जैसे थे

आर्णी ■ धनराज पवार

सावली सदोबा येथील पीएचसीचा आहे का कोणी वाली हो



आर्णी तालुक्यातील सावळी सदोबा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रातील समस्या दिवसेंदिवस गंभीर बनत चालल्या आहेत.कधी औषधांचा तुटवडा, तर कधी डॉक्टरांचा अभाव, अशा अनेक समस्यांनी हे आरोग्य केंद्र त्रस्त आहे. नागरिकांना साध्या-सोप्या उपचारांसाठीही तासनतास वाट पाहावी लागते. विशेषतः रात्रीच्या वेळी येथे डॉक्टरांची अनुपस्थिती हा प्रमुख समस्या ठरली आहे.काल रात्रीच्या सुमारास एका रुग्णाला तातडीच्या उपचारांसाठी प्राथमिक आरोग्य केंद्रात आणण्यात आले. मात्र, प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपस्थित नसल्याने रुग्णाच्या नातेवाईकांनी डॉक्टरांना बोलावण्याकरिता गेले असता डॉक्टर हजर नव्हते फोन केला असता मी बाहेरगावी आहे त्यामुळे एखाद्या डॉक्टरांना बोलू उपचार करून घ्या असा सल्ला दिल्याने प्राथमिक आरोग्य केंद्रातील डॉ.मुख्यालयाचा आजार कायमचाच असल्याचे दीसुन आले शेवटी, रुग्णाच्या कुटुंबीयांनी प्रकृती जास्त असल्याने खाजगी वाहनाने यवतमाळ येथे देण्यात आले

काही दिवसांपूर्वी जिल्हा वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या पथकाने या आरोग्य केंद्राला भेट देऊन पाहणी केली होती. त्या वेळी नागरिकांनी विविध तक्रारींचा पाढा वाचून दाखवला. औषधांचा तुटवडा, डॉक्टरांची गैरहजेरी, आवश्यक वैद्यकीय उपकरणांचा अभाव,आणि अपुऱ्या सुविधा यांसारख्या समस्यांवर पथकाने तत्काळ उपाययोजना करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, त्या भेटीनंतरही परिस्थितीत कोणताही बदल झालेला नाही.रात्रीच्या वेळी डॉक्टरांची अनुपस्थिती आणि तातडीच्या सेवांचा अभाव यामुळे रुग्णांचे आरोग्य गंभीर धोक्यात येत आहे. अनेक वेळा किरकोळ आजारांवर वेळीच उपचार मिळाले असते, तर रुग्णाला मोठ्या संकटातून वाचवता आले असते. मात्र, अशा हलगर्जीपणामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना खाजगी रुग्णालयांवर अवलंबून राहावे लागते, ज्याचा आर्थिक फटका त्यांना बसतो.जर वेळेवर उपचार मिळणार नसतील, तर प्राथमिक आरोग्य केंद्र कशाकरीता संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला तरी जिल्हाधिकारी साहेबांनी आरोग्य अधिकाऱ्याच्या मनमानी कारभार थांबवावा व ज्या जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यानी केलेल्या पाहणीवर काय कारवाई झाली व अहवाल मागवुन प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सेवा सुरळीत करावी अशी मागणी परिसरातून होत आहे

ओपीडी वेळेतही दवाखाना राहते बंद

१९ मार्च २०२५ रोजी बुधवार ला १६ .१२ मिनिटांनी सुध्या दवाखाना बंद राहते इतर वेळेस चालू राहते काय असा प्रश्न सर्वसामान्य जनतेला पडलेला आहे वरिष्ठ कर्मचारी लक्ष देत नसेल असे या फोटो वरून स्पष्ट दिसत आहे की पीएचसी वेळेस सुद्धा दवाखाना बंद आहे असे या फोटो वरून दिसत आहे

जिल्हा परिषद नागपूर सरळ सेवा पदभरती सन २०२३

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : जिल्हा परिषद नागपूर सरळ सेवा पदभरती सन २०२३ अंतर्गत आरोग्य सेवक पुरुष ५०इया पदाकरीता दिनांक २८ मार्च २०२५ रोजी स्व.श्री.आबासाहेब खेडकर सभागृह जिल्हा परिषद नागपूर येथे समुपदेशन प्रक्रिया आयोजित करण्यात आलेली होती. समुपदेशन प्रक्रियेमधे आरोग्य सेवक पुरुष ५०इ पदाचे हंगामी फवारणी कर्मचारी क्षेत्रीय प्रमाणपत्र धारण करणाऱ्या तीन उमेदवारांना व अंतिम निवड गुणवत्ता यादीतील ६२ अशा एकूण ६५ उमेदवारांना माननीय मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नागपूर विनायक महामुनी यांचे हस्ते पदस्थापना नियुक्ती आदेश देण्यात आले. सदर समुपदेशन प्रक्रिया उपमुख्य कार्यकारी अधिकारी विपुल जाधव व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. राजकुमार गहलोत यांचे विशेष उपस्थितीमध्ये राबविण्यात आली. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडून सर्व निवड झालेल्या उमेदवारांना पुढील भविष्यासाठी व आरोग्य सेवेकरीता उत्कृष्ट कार्य करण्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. प्रक्रिया यशस्वीपणे राबविण्याकरता आरोग्य विभागातील सहा. प्रशासन अधिकारी व क.प्र.अ. बाविसकर, खराबे, कपाळे, थाटे, धूर्वे, विकास तभाने यांनी सहकार्य केले.

पत्रकारांसाठी राज्यस्तरीय दोन दिवसीय अधिवेशन संमेलन आमदार निवासात



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर :जन ग्रामीण पत्रकार संघ महाराष्ट्र आणि वर्किंग जर्नालिस्ट ऑर्गेनाइजेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय राज्यस्तरीय पत्रकार अधिवेशनाचे आयोजन २९ आणि ३० मार्च रोजी सिव्हिल लाईन आमदार निवास येथे सकाळी ११ ते ५ या दरम्यान संमेलनाचे आयोजन केलेले आहे. ज्यामध्ये डिजिटल प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचे पत्रकार एकत्रित येऊन मेळावा संपन्न होईल व याच वेळेस अधिवेशन घेतले जाईल. अशी माहिती अध्यक्ष प्रतीक पांडे यांनी पत्रकारांना सांगितले. या अधिवेशनात जास्तीत जास्त मोठ्या संख्येने डिजिटल प्रिंट आणि इलेक्ट्रॉनिक मीडियाचे पत्रकारांना आमंत्रित केले जात आहे. याप्रसंगी पत्रपरिषदेत उपस्थित मंचावरील प्रतीक पांडे, संजय तिवारी, राजे शुक्ला, शितल नंदनवार, चांदणी पाठक, शुक्ला यांची उपस्थिती होती.

लासूर स्टेशनच्या शिवमहापुराण कथेचे पंडित प्रदीप मिश्रा यांना निमंत्रण

आयोजकांसह श्री घृष्णेश्वर प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांचीही उपस्थिती

दै, जनप्रभात गंगापूर प्रतिनिधी
सुनिल झिंजुर्डे पाटील



गंगापूर : गंगापूर तालुक्यातील लासूर स्टेशन येथे १६ एप्रिल ते २२ एप्रिल दरम्यान होणाऱ्या शिवमहापुराण कथेचे निमंत्रण पंडित प्रदीप मिश्रा यांना देण्यात आले.

लासूर स्टेशन येथील आयोजकांनी दिनांक २८ मार्चला थेट श्रीक्षेत्र सिहोर (मध्यप्रदेश) येथे जाऊन आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ता परमपूज्य पंडित प्रदीपजी मिश्रा यांना लासूर स्टेशन येथे पंडित राघवजी मिश्रा यांच्या सुश्राव्य वाणीतून १६ एप्रिल ते २२ एप्रिल दरम्यान शिवमहापुराण कथा होणार असून यां कथेच्या कार्यक्रमाचे निमंत्रण पंडित प्रदीपजी मिश्रा यांना देऊन यां कथेत आपणही उपस्थिती दर्शवावी यासाठी त्यांना आमंत्रित केले आहे यावेळी आयोजक गणेश अंबादास व्यवहारे यांच्यासह घृष्णेश्वर प्रतिष्ठानचे वाल्मीक बोरसे,विशाल मुंदडा, शिवाजी चव्हाण, मारुती गिधाने, संतोष बिरुटे,उत्कर्ष वंजारे,अनिल मोरे, रामकिसन हाडके आदींची उपस्थिती होती.

पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने त्या बाळाचा जीव वाचला ;नेलसन रुग्णालयातील डॉक्टरानी केले शर्थीचे प्रयत्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : अमरावती जिल्ह्यातील मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात सिमोरी गाव... गावातील रहिवाशी बेबी उर्फ फुलवंती राजू अधिकार यांना २२ दिवसांचे बाळ आहे. या बावीस दिवसाच्या बालकाच्या अंगावर त्याच्या आईने घरगुती उपचाराच्या नावाखाली पोटावर चटके देण्याचे अघोरी कृत्य केले. त्यात त्याची प्रकृती गंभीर झाली .ते बाळ वाचेल की नाही याची शक्यता नव्हती मात्र, अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या पुढाकाराने व पोलीस अधीक्षक विशाल आनंद आणि नागपुरातील नेल्सन रुग्णालयातील डॉक्टरांनी केलेल्या उपचारामुळे २२ दिवसाच्या बाळाला पुनः जीवदान मिळाले.

मेळघाटातील चिखलदरा तालुक्यात अंधश्रद्धेची घटना घडली. अवघ्या बावीस दिवसाचे बाळ हृदयाचा त्रास असल्याने ते सतत रडायचं. सतत रडत असल्यानं त्याच्या आईनं अंधश्रद्धेतून आपले बाळ बरे व्हावे म्हणून चक्क विळा गरम करून त्याच्या पोटावर चटके देत अघोरी कृत्य केले. प्रारंभी त्या बाळावर अमरावती येथील इफरीन रुग्णालयात अतिदक्षता विभागात उपचारासाठी दाखल करण्यात आले मात्र त्याची प्रकृती अधिक चिंताजनक झाली असताना या घटनेची माहिती अमरावती व नागपूरचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना देण्यात आली.त्यांनी या गंभीर घटनेची दखल घेत त्या बाळावर त्वरीत उपचार व्हावेत म्हणून चंद्रशेखर बावनकुळे यांनी अमरावती जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांना बाळाला वाचविण्यासाठी सर्व प्रयत्न करण्याचे आदेश दिले .त्यानंतर लगेच अमरावती ते नागपूर 'ग्रीन कॉरिडॉर' निर्माण करण्याचे आदेश दिले आणि २६ फेब्रुवारीला मध्यरात्री बुधवारी रात्री अमरावती शहर आणि अमरावती ग्रामीण पोलिसांनी अतिरिक्त मनुष्यळाचा? वापर करत विशेष रुग्णवाहिकेतून त्या बाळाला नागपूरच्या धंतोली भागातील नेल्सन य खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या ठिकाणी अतिदक्षता विभागात दाखल करत डॉक्टरांनी त्याच्यावर तात्काळ सुरु केले. त्याला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले होते. त्याच्यावर उपचार सुरु असताना त्याच्या हृदयावर शस्त्रक्रिया करण्यात आली. ज्या स्थितीत त्या बाळाला आणले होते .तो वाचेल की नाही अशी स्थिती होती मात्र रुग्णालयाच्या संचालिका राधा साहू, केंद्र प्रमुख डॉ. सोनालकुमार भगत, वित्त संचालक गणेश खरोडे, डॉ. एस. पी. राजन, डॉ. निलेश दारव्हेकर, डॉ. सचिन कुथे आणि डॉ. कुलकर्णी यांनी त्या बाळावर उपचार केले आणि त्याला जीवदान दिले.

विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून छत्रपती संभाजी विद्यालयाने विद्यमान आमदार डॉ अतुल भोसले बाबा यांचा वाढदिवस साजरा केला



कराड ■ प्रमोद दिवाण

कराड : शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ रेठरे बुद्रुक छत्रपती संभाजी विद्यालय प्राथमिक विभाग शिवनगर मध्ये कराड दक्षिणचे विद्यमान आमदार डॉक्टर अतुल भोसले बाबा यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांचे मनोगते व्यक्त करण्यात आली. वाढदिवसानिमित्त विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पाटील मॅडम व सर्व शिक्षक यांच्यातर्फे खाऊ वाटप करण्यात आले. मान्य डॉक्टर अतुल भोसले बाबा यांच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माननीय खरात सर यांनी केले. मा.डॉक्टर अतुल भोसले बाबा यांच्या कार्याची माहिती विद्यालयाच्या मुख्याध्यापिका पाटील मॅडम यांनी सविस्तरपणे सांगितली. तसेच कराड दक्षिण मधील विविध विकास कामांचे माहिती व बाबांच्या कार्याबद्दल माहिती मुख्याध्यापक मॅडम यांनी सांगितली. कार्यक्रमाचे आभार शिंदे सर यांनी मानले.

अखेर विकेट पडलीच : लाचखोर महिला जिल्हा क्रीडा अधिकारी कविता नावंदे रंगेहाथ एसीबीच्या जाळ्यात

परभणी ■ दत्तात्रय कराळे



जिल्ह्यातील शालेय क्रीडा स्पर्धांचे आयोजन आणि क्रीडा विकासाच्या योजनांची अंमलबजावणी करुन विद्यार्थ्यांची शारीरिक, बौध्दिक व खेळांविषयीचे ज्ञान विकसित करणे हे जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांचे काम असते. त्या अनुषंगाने क्रीडा संचालनालयातर्फे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा क्रीडा अधिकारी नियुक्त करुन संबंधित कार्यालयाची स्थापना केली जाते. त्यांना शासन नियमांप्रमाणे वेतन व अन्य सर्व लाभही प्रदान केले जातात. तथापि वादग्रस्त व लाचखोर ठरलेल्या कविता नावंदे यांनी आपल्या कारकीर्दीत वरीलपैकी नेमकं काही केलं आहे की, निव्वळ काचेच्या रकमाच उकळल्या, यासंबंधी चौकशी होणे गरजेचे असल्याची मागणी पुढे येत आहे.

परभणी : जिल्हा क्रीडा स्पर्धा कार्यालयाशी संबंधित कामाचे प्रलंबित देयक काढण्यासाठी रुपये दीड लाखांची लाच घेताना जिल्हा महिला क्रीडा अधिकारी कविता नावंदे आणि सहकारी अधिकारी खुस्सा या दोघांची एकदाची विकेट पडलीच. लाच घेताना त्यांना एसीबी पथकाने रंगेहाथ पकडले. ही कारवाई गुरुवार, दि.२७ मार्च २०२५ रोजी (एसीबी) लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातच शिताफीने सापळा रचून ही खळबळजनक कारवाई केली.

खेळाडूंना सुविधा न पुरवता त्यांची हेळसांड करणे, नागरिक, विविध संस्था व खेळाडूंशी सहकार्याची भावना न ठेवता गैरमार्गाने वसूली हेच एक कलमी कारस्थान करणाऱ्या कविता नावंदे या मागील अनेक दिवसांपासून कमालीच्या वादग्रस्त ठरल्या होत्या. त्यांच्या मनमानी कार्यप्रणालीवर जिल्हाभरातील अनेकजण प्रचंड नाराज होते. त्रस्त नागरिकांकडून त्यांच्या वादातीत प्रकरणी समाजमाध्यमांवर ऑडिओ क्लीपही व्हायरल केली जात होती.

दरम्यान, याप्रकरणी पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार असे समजते की, क्रीडा स्पर्धा कार्यालयाशी संबंधित कामांचे प्रलंबित देयक काढण्यासाठी क्रीडा अधिकारी कविता नावंदे यांनी संबंधितांकडे स्वतःसाठी दोन लाख व सहकारी अधिकाऱ्याला रुपये ५० हजार असे मिळून रुपये अडीच लाखांची लाच मागितली होती. त्या अनुषंगाने एक लाखाची रोकड यापूर्वीच नावंदे यांनी स्वीकारली होती. उर्वरित दीड लाख रुपयांच्या रकमेची मागणी केल्यामुळे याप्रकरणी देण्याची इच्छा नसलेल्या संबंधितांने परभणी लाचलुचपत प्रतिबंधक पथकाकडे याप्रकरणी तक्रार गुदरली होती. त्या अनुषंगानेच लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने सापळा रचून रुपये दीड लाखांची रक्कम स्वीकारताना कविता नावंदे आणि सहकारी अधिकारी यांना रंगेहाथ पकडले.

पुढील कारवाईसाठी लाचखोर नावंदे यांना नवा मोंढा पोलीस ठाण्यात नेण्यात आले. कारवाईचे सोपस्कार सुरु असताना त्यांच्या परभणी सह अन्य ठिकाणच्या घरांची झडती घेण्यात आली तेव्हा बरेच मोठे घबाड एसीबीच्या हाती लागल्याचे बोललं जात आहे..

मनमानी कारभाराच्या जनक आणि वादग्रस्त क्रीडा अधिकारी म्हणून जिल्हाभर गाजलेल्या कविता नावंदे यांच्या बाबतीत स्थानिक उबाठा शिवसेना आमदार डॉ.राहूल पाटील यांनी दोन दिवसा पूर्वीच त्यांच्या विरोधात विधानसभेत आवाज उठविला होता. त्यांच्या सर्व कारनाम्यांवर प्रकाश टाकून शासनाचे लक्ष वेधत कारवाई आणि विभागीय चौकशीची मागणी सभागृहात लावून धरली होती.

नीतिमतेचा कळस झाला असावा म्हणून की काय, एसीबीचे अधिकारी अशोक इप्पर यांच्या मार्गदर्शनाखाली आज केलेल्या कारवाईत पथकातील समाविष्ट सर्वांनीच शिस्तबद्ध जबाबदारी पार पाडली. एकूणच काय तर बुडत्या चे पाय खोलात या अनुषंगाने लाचखोरीत लिप्त जिल्हा क्रीडा महिला अधिकारी श्रीमती नावंदे यांच्या भ्रष्टाचारी कवितेचा पहिला अंक सध्या पार पडला असून लिप्त सहकारी अधिकाऱ्यावर मात्र बीड जिल्ह्यात यापूर्वीचा एक गुन्हा दाखल असल्याची माहिती मिळाली आहे.

शहरातील बसस्थानकाचा कायापालट..परंतु ग्रामीण भागातील प्रवाशी निवारा मोजतोय आहे अखेरचे घटका; विरुळ येथील प्रवाशी निवाऱ्याची दुर्दशा

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



विरूळ आकाजी : जिल्ह्यातील शहरी भागातील बसस्थानक करोडो रुपये खर्च करून चकचकीत बनविण्यात आले परंतु ग्रामीण भागातील उभे असलेले प्रवाशी निवारे मात्र शेवटचे घटका मोजतांना दीसत आहे.वर्धा जिल्ह्यातील अनेक गावात प्रवाशांना बस येण्याची वाट बघावी लागते.यासाठी प्रवाशांची सोय व्हावी यासाठी जिथे बस जाईल तिथे प्रवाशी निवाऱ्याची सोय केली परंतु हे निवारे काही दीवसातच कोसुळुन पडल्याने प्रवास करताना प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गैरसोय होत आहे.विरुळ बसस्टॉपच्या निवाऱ्याच्या भिंती कोसळ्या तर वरचे छप्पर उडाले खिडक्या दारे तुटले तसेच आजूबाजूला घाणीचे साम्राज्य दिसून येत आहे त्यामुळे हे बांधलेले निवारे धुळखात पडुन असल्याने प्रवाशांना व विध्यार्थ्यांना बस ची वाट पाहत भर उन्हात तर भर पावसाळ्यात रोडवर उभे राहावे लागत आहे.या जिर्ण झालेल्या निवार्यात आता मोकाट कुत्र्यांचा वावर असतो.शासनाने लाखो रुपये खर्च करून हे निवारे बांधले परंतु संबंधित कंत्राटदाराने या कामात गैरप्रकार केल्याने हे निवारे काही दीवसातच मोडकळीस आले आहे.एकीकडे शहरातील बसस्थानकाचा कायापालट झाला तर ग्रामीण भागातील निवारे शेवटच्या घटका मोजत असताना मात्र शासनाचे लोकप्रतिनिधी यांचे याकडे दुर्लक्ष होत असल्याने..या गंभीर बाबीकडे मंत्री महोदय आमदार खासदार यांनी लक्ष देण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

'शिरूरकरांना पाणीटंचाई जाणवू देणार नाही..!'आमदार माऊली आबा कटके

रांजणगाव गणपती प्रतिनिधी बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती: शिरूर-हवेली आमदार माऊली आबा कटके यांच्या प्रयत्नांना यश - शिरूरकरांना दिलासा. शिरूर शहरातील पाणी टंचाईवर अखेर तोडगा निघाला असून, आज पासून नियमित पाणीपुरवठा सुरू होणार आहे. गेल्या काही दिवसांपासून दिवसाआड पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागत होता. मात्र, आमदार माऊली आबा कटके यांच्या सततच्या प्रयत्नांमुळे आणि तातडीच्या हालचालींमुळे कोल्हापूर पद्धतीच्या बंधाऱ्यात पाणी उपलब्ध करून देण्यात आले आहे. २० मार्चपासून सुरू झालेल्या दिवसाआड पाणी पुरवठ्यामुळे नागरिकांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली होती. उन्हाळ्यात ही समस्या अधिक गंभीर होऊ नये, म्हणून आमदार माऊली आबा कटके यांनी तत्काळ पाणीपुरवठा विभाग, नगरपरिषद अधिकाऱ्यां? सोबत चर्चा केली. त्यानुसार, आवश्यक पाणी उपलब्ध करून देण्यात आले असून, आजपासून पूर्ववत दररोज पाणीपुरवठा सुरू होणार आहे. आमदार कटके यांच्या पुढाकारामुळे शिरूरकरांना दिलासा मिळाला असून, उन्हाळ्यात पाणीटंचाई जाणवू नये यासाठीही पुढील नियोजन करण्यात येत आहे. 'शिरूरवासीयांना पाणी टंचाईचा त्रास होऊ देणार नाही. भविष्यातही योग्य नियोजन करून सतत पाणी पुरवठा सुरू ठेवण्यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे आमदार माऊली आबा कटके यांनी सांगितले. नगरपरिषदेने नागरिकांना जबाबदारीने पाणी वापरण्याचे आवाहन केले आहे. पाणी साठवताना दक्षता घ्यावी, गळती टाळावी आणि गरजेपुरतेच पाणी वापरावे, असे प्रशासनाने सांगितले आहे.

नोटीस अथवा पूर्वसूचना न देता लाईट कनेक्शन तोडता येते का?

परभणी ■ दत्तात्रय कराळे



परभणी : आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यासाठी काही दिवसांचा कालावधी शिल्लक असल्याने सर्वत्रच वसुलीची धामधूम मोठ्या प्रमाणात सुरू आहे.व्यावसायिक वापरातील प्रॉपर्टी किंवा राहते घर असले तरीही त्याची विजेची काही थकीत रक्कम असेल तर ती न भरल्यास ग्राहकांचे थेट वीज कनेक्शन तोडले जाते. थकीत वीज बिलासाठी वीज जोड अथवा वीज कनेक्शन तोडण्यापूर्वी १५ दिवसांची लेखी सूचना देणे बंधनकारक आहे.

काही ठिकाणी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीतर्फे ग्राहकांकडून केवळ ५-६ दिवस बिल भरणा करण्यास उशीर झाला तरी कोणत्याही पूर्व सूचनेशिवाय वीजजोडणी अथवा कनेक्शन तोडले जाते.

कनेक्शन तोडण्यापूर्वी नोटीस अथवा पूर्वसूचना न देता बिल भरण्यासाठी ग्राहकाला आलेला एसएमएस म्हणजे ती नोटीस असू शकत नाही, हे स्पष्ट करण्यात आले आहे.

विद्युत अधिनियम २००३ कायदा तरतुदीतील कलम ५६ नुसार थकीत बिलासाठीही कनेक्शन तोडण्यापूर्वी १५ दिवस अगोदर लेखी पूर्वसूचना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. हे कलम देशभरातील विद्युत पुरवठा कंपन्यांना लागू करण्यात आले आहे. खासगी असो वा शासकीय, प्रत्येक वीज पुरवठादारास थकीत बिलाअभावी वीजजोडणी अथवा कनेक्शन तोडण्यापूर्वी लेखी पूर्वसूचना देणे अथवा नोटीस पाठविणे हे बंधनकारक करण्यात आले असून, तो ग्राहकांचा महत्त्वाचा तथा मुलभूत अधिकार आहे.

काही कारणाने वीजबिल भरण्यास नाममात्र उशीर झाल्यास वीज जोडणी अथवा कनेक्शन तोडणे हे पूर्णतः बेकायदेशीर आहे. काही वेळा आर्थिक वर्षातील टार्गेट पूर्ण करण्याच्या निमित्ताने अधिकारी व कर्मचाऱ्यांकडून अशा प्रकारच्या कारवाया केल्या जातात.मात्र अशा एकतर्फी कारवाईच्या विरोधात संबंधित तक्रारदार महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी किंवा ग्राहक न्यायालयात दाद मागू शकतात.

दरम्यान, ग्राहकांकडून वीज बिल भरण्यास वर नमूद केल्याप्रमाणे ५-६ दिवस उशीर झाला तरी ग्राहकांची समस्या समजून घेणे आवश्यक आहे. तथापि नियमन काळात वीज वारंवार खंडीत होत असते. अनेक वेळा तर एक फेस गायबच असतो. ज्यांची वीज अधिकारी तथा कर्मचारी यांच्याशी सलगी असते, त्यांना बऱ्याचदा नियमावलीच्या बाबतीत सवलती दिल्या जातात. किंबहुना त्यांची तशी घनिष्ठ मैत्री असल्याचा गैरफायदा घेत तेच महाभाग कधी कोणाचा जाणीवपूर्वक किटकॅट काढून बाजूला ठेवतात. अशा वेळी संबंधित ग्राहकांचे अनन्यसाधारण असे नुकसान होत असते. कोणाचं फ्रिज खराब होत असतं तर कोणाचा टीव्ही किंवा टेप (करप्ट) जळला जातो. वीज गुल होणे, ती गायब करणे किंवा हेत्वारोपाने ती मुद्दामहून बंद केली गेल्यास विविध उपकरणांचं नुकसान होतं ते वेगळंच. अशाप्रकारे नुकसान झाल्यास संबंधित वीज मंडळ अधिकारी तथा कर्मचारी त्या घटनेला जबाबदार धरले जाणे आवश्यक नाही का ? तसं झालं तर प्रत्येकजण आपली जबाबदारी ओळखून कर्तव्य पार पाडू शकतील, असं म्हटलं तर चुकीचं ठरले जाईल का ? तथापि तशा प्रकारचं दडपण तथा जबाबदारीची जाणीव जर प्रत्येकाला झाली तर काम आणि कर्तव्यात सुसुत्रता येणार नाही का ? असे नानाविध प्रश्न अद्यापही अनुत्तरीतच राहिले जाणार आहेत. शासन, प्रशासन तथा वीज मंडळाने यांचा जरुर विचार करायला हरकत नाही. परंतु यामध्ये ग्राहकाला दुय्यम वागणूक न मिळता वीज मंडळाला नव्हे तर ग्राहकांनाच खरी गरज असते, असंही न समजता मानवधर्म म्हणून सौहार्द आणि सलोखा कुठे तरी जोपासला जाणे गरजेचे ठरते.

आर्थिक वर्ष संपुष्टात येण्यापूर्वी सर्वत्रच वसुलीची धामधूम मोठ्या प्रमाणात सुरू आहे.व्यावसायिक वापरातील प्रॉपर्टी किंवा राहते घर असले तरीही त्याची विजेची काही थकीत रक्कम असेल तर ती न भरल्यास थेट वीज कनेक्शन तोडले जाते.

'भंडाऱ्यात सोनसाखळी चोरट्यांचा धुमाकूळ - खातरोडमध्ये वृद्धाला लुटले'

भंडारा ■ हंसराज

भंडारा - भंडारा शहरात दिवसेंदिवस सोनसाखळी चोरीच्या घटना वाढताना दिसत आहेत. अवघ्या दोन दिवसांपूर्वी विद्यानगर येथे बसमधून उतरलेल्या एका वृद्ध महिलेच्या गळ्यातील दागिने दुचाकीस्वारांनी खेचून नेल्याची घटना ताजी असतानाच, आता पुन्हा खातरोड येथे असाच प्रकार घडला आहे.

गुरुवारी (दि. २७ मार्च २०२५) सकाळी १० वाजताच्या सुमारास सरस्वती नगर, खातरोड येथील ७३ वर्षीय लक्ष्मण बोरकर हे नेहमीप्रमाणे फिरण्यासाठी गेले होते. परत येत असताना, गणेश कॅरम सेंटरजवळ काळ्या रंगाच्या युनिकॉर्न मोटारसायकलवर आलेल्या दोन अनोळखी इसमांनी त्यांना अडवले. 'इधर आओ, तुम गले में सोना पहनके घूमो मत, सोना निकालो' असे धमकावत, त्यांनी वृद्धाला घाबरवले. घाबरलेल्या बोरकर यांनी स्वतःच्या गळ्यातील १५ ग्रॅमची सोनसाखळी, त्यात २ ग्रॅम वजनाचे गणेश लॉकेट (किंमत ४२,५०० रुपये) आणि ६ ग्रॅम वजनाची अंगठी (किंमत १५,००० रुपये) असा एकूण ५७,५०० रुपयांचा ऐवज या अज्ञात चोरट्यांच्या हवाली केला.

याबाबत भंडारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अप.क्र. ३६०/२०२५ कलम ३१८(४), ३ (५) भा.न्या.सं २०२३, अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.. पोलीस उपनिरीक्षक नितनवरे पुढील तपास करत आहेत. दरम्यान, सतत वाढणाऱ्या सोनसाखळी चोरीच्या घटनांमुळे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. वृद्ध नागरिकांना लक्ष्य करून होणाऱ्या या गुन्ह्यांवर पोलिसांनी अधिक प्रभावी कारवाई करण्याची गरज आहे, अन्यथा अशा घटना दिवसेंदिवस वाढण्याची शक्यता आहे.

देवळी पुलगाव बस आगारांसाठी नवीन बसेसची मागणी: आमदार बकाने



वर्धा ■ प्रतिनिधी

पुलगाव: देवळी पुलगाव मतदार संघातील नवनियुक्त आमदार मा. राजेश बकाने यांनी परिवहन मंत्री श्री प्रतापजी सरनाईक यांची भेट घेऊन त्यांना देवळी पुलगाव मतदार संघातील बस आगारांच्या दुरावस्थेबाबत कल्पना देऊन विद्यार्थी आणि नागरिकांना बसेसच्या दुरावस्थेमुळे होणाऱ्या त्रासाबाबत अवगत केले आणि त्यांच्याकडे देवळी विधानसभेतील आगारांकरिता वीस नवीन बसेसची मागणी केली. त्यावर त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला त्यामुळे येत्या काही दिवसात आपल्याला नवीन बसेस मिळतील. यामुळे पुलगाव- देवळी जाणे-येणे करनाऱ्या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आणि कर्मचारी लोकांना सुद्धा जाण्यायेण्यास अवगत होईल.

बेकायदा होर्डिंग्जवर एफआयआर अशक्य : राज्य सरकार

परभणी ■ दत्तात्रय कराळे

परभणी : राज्यात रोज वेगवेगळ्या एजन्सीतर्फे अथवा पक्षातर्फे मोठ-मोठे होर्डिंग लावले जातात. मात्र यापैकी बेकायदेशीर होर्डिंग्ज लावण्यास जबाबदार असलेली व्यक्ती ओळखण्यात अडचणी येत आहेत. त्यामुळे राज्यात बेकायदेशीर होर्डिंग्ज लावणाऱ्या व्यक्तींविरुद्ध एफआयआर नोंदवता येत नाही, असे महाराष्ट्र सरकारने मुंबई उच्च न्यायालयात म्हटले आहे.

डॉ.बिरेंद्र सराफ यांनी राज्य सरकारतर्फे न्यायालयात बाजू मांडली. बेकायदेशीर होर्डिंग्जबाबतच्या अनेक याचिकांवर सुनावणी दरम्यान मुख्य न्यायाधीश आलोक आराधे आणि न्यायमूर्ती एम.एस.कर्णिक यांच्या खंडपीठासमोर हे निवेदन देण्यात आले. न्यायालय गेल्या अनेक वर्षांपासून या समस्या सोडवण्यासाठी निर्देश देत आहे. तरीही बेकायदेशीर होर्डिंग्जचे प्रमाण कमी होत नसल्याचे दिसत आहे. त्यामुळे यांच्यावर एफआयआर का नोंदवले गेले नाहीत? असा प्रश्न उपस्थित केला गेला. या प्रकरणावर लवकरात लवकर कारवाई झाली तर बेकायदेशीर होर्डिंग्जची संख्या विशेषतः राजकीय पक्षांनी उभारलेल्या होर्डिंग्जची संख्या कमी होऊ शकते, असे न्यायालयाने म्हटले आहे.

दरम्यान, राज्य सरकारतर्फे बाजू मांडणारे वकील सराफ यांनी काही मुद्द्यांवर स्पष्टीकरण दिले. केवळ बॅनरच्या आधारे एफआयआर दाखल करणे शक्य नाही. कारण अधिकारी ते बॅनर कोणी लावले हे निश्चित करू शकत नाहीत. ज्या व्यक्तीचा चेहरा बॅनरवर आहे त्याच्याविरुद्ध आपण थेट एफआयआर दाखल करू शकत नाही, असे सराफ यांनी न्यायालयाला सांगितले. बेकायदेशीर होर्डिंग काढून टाकणाऱ्यांना संरक्षण देण्यासाठी पोलीस अधिकाऱ्यांना कडक सूचना देण्यात आल्या आहेत. दरम्यान, निवडणुकांच्या किंवा सणांच्या काळात बेकायदेशीर होर्डिंगचे प्रमाण जास्त असते. त्यामुळे तेव्हा अंमलबजावणी केली जात नाही. मात्र, आता महानगरपालिकांना कारवाईचे निर्देश देण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्रचार्य महाराज यांच्या प्रेरणेतून ९२ वे मरणोत्तर देहदान

रांजणगाव गणपती प्रतिनिधी बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती:जगद्गुरु नरेंद्राचार्यजी महाराज यांनी त्यांच्या सांप्रदायाला मृत्यूनंतर ही देहदान करून समाजाच्या उपयोगी पडण्याचे आवाहन केले होते त्याला मोठा प्रतिसाद मिळतो आहे श्री क्षेत्र रांजणगाव गणपती सेवा केंद्र ता.शिरूर येथील मातोश्री कै काशीबाई किसन भंडारे वय ९९ यांचे निधन झाले त्यांच्या इच्छेनुसार मरणोत्तर देहदान करण्यात आले संस्थान च्या पुढाकाराने झालेले हे ९२ वे देहदान आहे

मातोश्री कै .काशीबाई भंडारे यांचा मृतदेह श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेज हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर, पुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला यावेळी काशीबाई भंडारे यांचा संपूर्ण परिवार . मुलगा बाळू भंडारे, युवराज भंडारे सून सौ .विद्या भंडारे, सौ संगीता भंडारे मुलगी सौ उषा जावळे व त्यांच्या नाती राजनंदिनी ,निर्जला, प्रेरणा ,जानवी ,किरण इ .उपस्थित होते यावेळी श्रीमती काशीबाई नवले मेडिकल कॉलेज पुणे सर्व डॉक्टर व कर्मचारी यांचे सहकार्य लाभले .

जन्मदात्री गेली रुढी परंपरा झूगारून कुटुंबाने घेतला महत्त्वाचा निर्णय म्हणून तर देहदान केले.आपल्या जवळच्या नात्यातील व्यक्तीचे निधन झाल्या नंतर त्याचा अंत्यविधी किंवा अंत्यसंस्कार करताना कुटुंबीय अतिशय संवेदनशील असते

मात्र अनेक जण रूढी परंपरांना फाटा देऊन नवा आदर्श घालून देण्याचा प्रयत्न करत असतात रांजणगाव गणपती येथील या आई चे मरणोतर देहदान भंडारे कुटुंबीयांनी केले .

यावेळी विजय बांदल पुणे जिल्हा अध्यक्ष निखिल शिंदे सचिव पुणे जिल्हा राजकुमार म्हाळस्कर ,सागर देवकर, डॉ.बाळासाहेब मानकर, विलास लांडे सांगली जिल्हा निरक्षक ,सचिन काकडे सोलापूर जिल्हा निरीक्षक, जालिंदर मांढरे तालुकाध्यक्ष ,अशोक ढवळे मा.तालुका सचिव तसेच राहुल सकपाळ ,कैलास लांडे, दिलीप साळवे, ता सचिव, निलेश बांदल युवा अध्यक्ष, प्रविण वाळुंज , सचिन राऊत , गणेश लांडे, प्रशात जेजूरकर, योगेश खुडे, सौ अनिता गवते, सौ निता ढवळे व भक्तगण शिष्य साधक उपस्थित होते.

शिंगोरीत 'हर घर जल' योजना अपयशी - गावकरी पाण्यासाठी वणवण फिरण्यास मजबूर



भंडारा ■ हंसराज

भंडारा : भंडारा तालुक्यातील शिंगोरी गावात जल जीवन मिशन अंतर्गत 'हर घर जल' योजना राबविण्यात आली होती. ३० मार्च २०२३ रोजी सुरू झालेले काम ३० मार्च २०२४ रोजी पूर्ण झाल्याचे योजनेच्या फलकावर नमूद आहे. मात्र, प्रत्यक्षात गावकरी आजही पाण्यासाठी तळमळत आहेत. गावातील उपलब्ध पाणीपुरवठा उन्हाळ्यात पिवळसर आणि अशुद्ध पाणी पुरवतो, त्यामुळे नागरिक चिंतेत आहेत. टाकी बांधली गेली, पाइपलाइनही टाकली गेली, पण अद्याप गावकऱ्यांना नळ जोडणी मिळालेली नाही. त्यामुळे लोकांना अद्याप पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग आणि वाफकोस लिमिटेड यांच्या ढिसाळ नियोजनामुळे लाखो रुपयांची गुंतवणूक वाया गेल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. प्रशासन आणि लोकप्रतिनिधी जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करीत ग्रामस्थांनी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केल्या आहेत. जर लवकरच उपाययोजना केली नाही, तर गावकरी रस्ता रोको आंदोलन, उपोषण करण्यास बाध्य होतील, तसेच कर भरण्यास नकार देतील, असा इशाराही दिला आहे. शिवाय ग्रामपंचायतीने जर हा प्रश्न सोडवू शकत नसेल, तर शिंगोरी आणि कोकनागड यांची स्वतंत्र ग्रामपंचायत करण्यात यावी, अशीही मागणी गावात जोर धरू लागली आहे. त्यामुळे प्रशासनाने त्वरित या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे.

क्षयरोग उच्चाटनासाठी लोकसहभाग महत्त्वाचा : डॉ. घेवडे

सावंगी रुग्णालयात जागतिक क्षयरोग दिन साजरा

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : क्षयरोग पूर्णपणे बरा होऊ शकतो, मात्र या आजाराच्या समूळ उच्चाटनासाठी प्रत्येक नागरिकाचा सहभाग आवश्यक आहे, असे मत महाराष्ट्र क्षयरोग टास्क फोर्सचे अध्यक्ष तथा सावंगी (मेघे) येथील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील श्वसनरोग विभाग प्रमुख डॉ. बाबाजी घेवडे यांनी जागतिक क्षयरोग दिवस कार्यक्रमात व्यक्त केले.

सावंगी रुग्णालयातील हिप्पोक्रेटस सभागृहात श्वसनरोग व सामुदायिक औषधीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या जनजागृतीपर कार्यक्रमाचे उद्घाटन विशेष कार्य अधिकारी संजय इंगळे तिगावकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी, बधिरीकरण तज्ज्ञ डॉ. विवेक चकोले, श्वसनरोग तज्ज्ञ डॉ. उल्हास जाधव, सामुदायिक औषधीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सोनाली चौधरी, डॉ. स्वरुपा चकोले यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी डॉ. बाबाजी घेवडे यांनी क्षयरोगाचा इतिहास, लक्षणे, उपचार याविषयी सखोल मार्गदर्शन केले. क्षयरोगासंबंधित समाजातील गैरसमज आता कमी होत असून जीन एक्स्पर्टसारख्या आधुनिक चाचण्यांद्वारे जलद निदान करून राष्ट्रीय क्षयरोग निर्मूलन कार्यक्रमांतर्गत सुचविण्यात आलेल्या पद्धतीने उपचार घेतल्यास हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो, असे डॉ. घेवडे म्हणाले. मृत्यूसाठी मोठ्या प्रमाणात कारणीभूत ठरलेल्या क्षयरोगाचे जगभरातून निर्मूलन करण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांसोबतच व्यापक जनजागृतीची गरज असल्याचे मत अध्यक्षीय भाषणात संजय इंगळे तिगावकर यांनी व्यक्त केले.

या कार्यक्रमात क्षयरोगासंबंधी शोधप्रबंधासाठी अनुदान प्राप्त झालेले डॉ. अश्विन करनान, डॉ. शिवकिरण रेड्डी, डॉ. प्राजक्ता घेवडे, डॉ. हर्षित रेड्डी या पदव्युत्तर विद्यार्थ्यांना अतिथींच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने वैद्यकीय महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजूषा, नर्सिंग महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी निबंध लेखन, भित्तिपत्रक निर्मिती आदी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अमिषा सोनी व डॉ. सृष्टी जैन यांनी केले.

या आयोजनात डॉ. विवेक अलोने, डॉ. जावेद शेख, डॉट्स सेंटरचे मंगेश खोंडे, रूपेश बिजमवार, स्मिता नाईक, ममता मेघे, अभिनय वाकोडे यांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. वैद्यकीय शिक्षण व संशोधन आणि आरोग्य सेवा या दोन्ही स्तरावर हा उपक्रम महत्त्वाचा आहे, अशा सदिच्छा जवाहरलाल नेहरू वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. अभय गायधने व सावंगी रुग्णालयाचे मुख्य वैद्यकीय अधीक्षक डॉ. चंद्रशेखर महाकाळकर यांनी दिल्या.

वर्धा-हिंगणघाट महामार्गाला तडे : खासदार अमर काळे यांनी केली पाहणी

खासदार अमर काळे यांनी रस्त्याच्या कामाबाबत तीव्र नाराजी केली व्यक्त

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा हिंगणघाट महामार्गाचे काम जवळपास दोन ते तीन वर्षे आधी पूर्ण झाले परंतु या मार्गाला अनेक ठिकाणी मोठे तडे गेले आहे, त्यामुळे या मार्गावर या तडयामुळे अपघात सुद्धा होत आहे, खासदार अमर काळे यांना मागील काही दिवसापासून याबाबत नागरिकांच्या काही तक्रारी प्राप्त झाल्या होत्या त्याच अनुषंगाने खासदार अमर काळे यांनी या महामार्गाची पाहणी केली सदर मार्गाचे पाहणी करत असताना वर्धा ते हिंगणघाट मार्गावर अनेक ठिकाणी लांब आणि मोठे तडे गेले असल्याचे दिसून आले, तसेच या मार्गावरील येत जात असलेल्या नागरिकांनी थांबून तसेच परिसरातील नागरिकांनी खासदार अमर काळे यांना या रस्त्याच्या समस्या बाबत व होत असलेल्या अपघाताबाबत माहिती दिली, खासदार अमर काळे सदर रस्त्याचे पाहणी करतांना सदर रस्त्याचे काम अत्यंत निष्कृष्ट निष्कृष्ट दर्जाचे झाले असल्याचे निदर्शनास आले अवघ्या दोन ते तीन वर्षातच सदर रस्ता हा मोठ्या प्रमाणात खराब झाले असल्याचे दिसून आले, तसेच खासदार अमर काळे यांनी स्वतः उभे राहून महामार्गावर पडलेल्या तड्यांची पाणी केली असता जवळपास पाच ते सहा इंच इतके व खोलवर असलेले तडे लांबवर व अनेक ठिकाणी दिसून आले रस्त्याच्या झालेल्या कामाबद्दल व कामाच्या दर्जाबद्दल खासदार अमर काळे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.

बोरगाव मेघे येथे नागरिकांचा राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये उत्स्फूर्त प्रवेश ; कु- तेजस्वी शांतारामजी पदिले युवती उपजिल्हाध्यक्ष वर्धा जिल्हा राष्ट्रवादी कॉग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गट

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : वर्धा जिल्ह्यातील बोरगाव मेघे येथे कु. तेजस्वी शांताराम पदीले यांच्या मार्गदर्शनाखाली मोठ्या संख्येने नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मध्ये जाहीर पक्षप्रवेश केला. या वेळी पक्षाचे माननीय खासदार अमर दादा काळे यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने हा प्रवेश सोहळा संपन्न झाला.

यानंतर तेजस्वी पदीले यांनी संवाद साधत सांगितले की, 'राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या धोरणांमुळे लोकांचा या पक्षाकडे ओढा वाढत आहे. जनतेच्या हितासाठी काम करणे हा माझा ध्यास असून, आगामी काळात पक्ष अधिक बळकट करण्यासाठी मी प्रयत्नशील राहील.

या पक्ष प्रवेश सोहळ्यात युवती जिल्हा उपाध्यक्ष विभागाच्या अंतर्गत नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी विशेष हेल्पलाइन नंबर सुरू करण्यात आला आहे. कोणत्याही नागरिकाला त्यांच्या वैयक्तिक समस्या, अडचणी किंवा ठराविक घटकांबाबत मदतीची आवश्यकता असल्यास, खालील नंबरवर संपर्क साधावाः ८३ ९० ८३ ९० २८ या हेल्पलाइनद्वारे नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी पूर्ण सहकार्य केले जाईल.

यासोबतच पुढील पक्षप्रवेशाचे नियोजन सुरू असून लवकरच त्याची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. वर्धा जिल्ह्यात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) मजबूत करण्यासाठी संघटनात्मक काम अधिक जोमाने सुरू करण्यात येणार आहे.

बोरगाव मेघे तील नागरिकांनी राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या विचारधारेवर विश्वास ठेवत मोठ्या प्रमाणात पक्षप्रवेश केला, हे या पक्षासाठी एक सकारात्मक पाऊल असल्याचे मानले जात आहे.

या कार्यक्रमात पक्षाच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांसह कु- तेजस्वीताई पदिले जिल्हा युवती उपजिल्हाध्यक्ष कु- प्रियंकाताई पाचखंडे श्री- प्रेमकुमार दिलीप नाईक, सागर विजय शिरसाठ स्थानिक कार्यकर्ते महिला आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिवंत सातबारा मोहिमेस शेतकऱ्यांनी सहकार्य करावे: जिल्हाधिकारी वान्मथी सी

१ एप्रिल ते १० मे या कालावधीत राबविणार जिवंत सातबारा मोहिम

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : राज्य शासनाच्या १०० दिवस कृती आराखड्यांतर्गत मयत खातेदार यांच्या वारसांना शेतजमीच्या अनुषंगाने विविध दैनंदिन कामकजासाठी आवश्यक असणा-या कागपत्रामध्ये वारसांची नोंद विहित कालावधीत अधिकार अभिलेखामध्ये नोंद न झाल्याने अडचणींना सामोरे जावे लागते. यासाठी संपूर्ण राज्यासह जिल्ह्यात १ एप्रिल ते १० मे २०२५ या कालावधीत जिवंत सातबारा मोहिम राबविण्यात येत आहे. या मोहिमे अंतर्गत सातबारावरील गावातील सर्व मयत खातेदारांच्या वारसांच्या नोंदीची प्रक्रिया पूर्ण करण्यात येणार आहे. यासाठी शेतक-यांनी प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

दि. १ एप्रिल ते ५ एप्रिल या कालावधीत ग्राम महसूल अधिकारी यांच्या मार्फत त्यांच्या साजा अंतर्गत येणा-या गावामध्ये चावडी वाचन करुन न्यायप्रविष्ठ प्रकरणे सोडून गाव निहाय मयत खातेदार यांची यादी तयार करण्यात येणार आहे. दि. ६ ते २० एप्रिल या कालावधीत वारसांसबंधी आवश्यक कागदपत्रे यामध्ये मृत्यु दाखला, वारसाबाबत सत्य प्रतिज्ञालेख, स्वंय घोषणापत्र, पोलीस पाटील, सरपंच, ग्रामसेवक यांचा, सर्व वारसांचे नावे, वय, पत्ते व दुरध्वनी क्रमांक भमणध्वनी क्रमांक रहिवास बाबतचा पुरावा ग्राम महसूल अधिकारी यांच्या कडे सादर करण्यात येणार आहे. त्यानंतर ग्राम महसूल अधिकारी स्थानिक चौकशी करुन मंडळ अधिकारी यांचे मार्फत वारस ठराव ई फेरफार प्रणालीमध्ये मंजूर करण्यात येइल.

दि. २१ एप्रिल ते १० मे २०२५ या कालावधीत ग्राम महसूल अधिकारी ई फेरफार प्रणालीमध्ये वारस फेरफार तयार करणार आहे. त्यानंतर महाराष्ट्र जमीन महसूल महसूल अधिनियम १९६६ च्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन मंडळ अधिकारी यांनी वारस फेरफार वर निर्णय घेऊन त्यानुसार सात बारा दुरुस्त करुन सर्व जिवंत व्यक्ती सातबारावर नोंदविण्यात येईल.

या मोहिमेच्या अंमलबजावणीसाठी सबंधीत तहसिलदार यांची त्यांच्या तालुक्यातील समन्वय अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे जिवंत सातबारा मोहिम जिल्ह्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी सर्व क्षेत्रिय अधिका-यांना सुचना देण्यात आल्या आहे.

मोहिमेअंतर्गत मयत शेतक-यांचे ७/१२ अभिलेखावार असलेले नाव कमी करुन त्यांचे वारसदार यांची नावे ७/१२ अभिलेखावर नोंदविण्यात येणार असुन यासाठी पात्र शेतक-यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

तालुक्यात 'जिवंत सातबारा' मोहीम! शेतकऱ्यांसाठी सुवर्णसंधी मोहिमेचा लाभ घ्यावा : तहसीलदार निलेश कदम

भंडारा ■ हंसराज



भंडारा : महसूल प्रशासनाच्या पुढाकाराने साकोली तालुक्यातील सर्व शेतकऱ्यांसाठी 'जिवंत सातबारा' मोहीम राबविली जात आहे. महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून ही विशेष मोहीम दिनांक १ एप्रिल २०२५ ते १० मे २०२५ या कालावधीत राबविली जाणार आहे.

मयत खातेदारांचे वारस अद्ययावत करण्याची संधी

तालुक्यातील ज्या शेतकऱ्यांच्या ७/१२ उताऱ्यावर मयत खातेदारांची नावे आहेत, त्यांचे वारस दाखल करण्यासाठी महसूल विभागाने ठरावीक कालमर्यादा निश्चित केली आहे.

असा असेल मोहिमेचा टप्पाः

१ ते ५ एप्रिल २०२५: तलाठी गाव निहाय मयत खातेदारांची यादी तयार करून चावडी वाचन करतील.

६ ते २० एप्रिल २०२५: आवश्यक कागदपत्रांसह वारसदारांनी अर्ज सादर करावा. ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) चौकशी करून वारस ठराव मंजूर करतील.

२१ एप्रिल ते १० मे २०२५: ई-फेरफार प्रणालीत नावनोंदणी करून सातबारा उतारे अद्ययावत केले जातील.

शेतकऱ्यांनी मोहिमेचा लाभ घ्यावा - तहसीलदारांचे आवाहन

सर्व पात्र शेतकरी बंधूंनी आपली कागदपत्रे वेळेत सादर करून या मोहिमेचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार निलेश कदम यांनी केले आहे. ही संधी गमावू नका आणि आपल्या जमिनीचे मालकी हक्क सुरक्षित करा!

अनुसुचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड धर्मपाल मेश्राम २ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) ॲड धर्मपाल मेश्राम दि. २ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे. दि. २ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन सकाळी ११ ते १२ वाजता जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्यासोबत सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी १२ ते १ वाजता मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा यांच्या सोबत आढावा विविध कामाची पाहणी, दुपारी १ ते २ मुख्याधिकारी नगर परिषद आर्वी यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. दुपारी २ ते २.३० राखीव दुपारी २.३० ते ३.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद देवळी यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी, दुपारी ३.३० ते ४.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद हिंगणघाट यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी, दुपारी ४.३० ते सायंकाळी ५.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद पुलगाव यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद सिंदी रेल्वे यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी करतील. त्यानंतर सोइनुसार नागपूर कडे प्रयाण करतील.

भोयर-पवार समाजाचा केंद्रीय ओबीसी सुचित समावेश करावा : खा. अमर काळे यांची संसदेत मागणी

वर्धा ■ प्रतिनिधी



भोयर-पवार समाजाचा ओबीसीमध्ये समावेश करण्यात यावा, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी दि. २६.०३.२०२५ ला संसदेत केली. महाराष्ट्रातील ओबीसी सूचीमध्ये समाविष्ट जाती समुहाच्या पहिल्या प्रस्तावात पोवार, भोयर, पवार या जातींची शिफारस आहे. पोवार, भोयर, पवार समाजाला महाराष्ट्र राज्याच्या ओबीसीच्या आरक्षण सुविधाही मिळतात. परंतु केंद्रीय ओबीसी आरक्षण सुविधा मिळत नाही. या विषयी मुंबईतील केंद्रीय ओबीसी आयोग, पुण्यातील महाराष्ट्र ओबीसी आयोग व महाराष्ट्र शासनाच्या ओबीसी मंत्रालय यांच्या उपस्थितीत दोनदा सुनावणी झाली. त्यानंतर जवळपास १५ जातींना केंद्रीय सूचीत समाविष्ट करुन घेण्यासाठी राज्य शासनाने केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय मंत्रालयाला प्रस्ताव मान्यता देण्यासाठी पाठविला होता. पण, अद्यापही मंजुरी मिळाली नाही. केंद्र सरकारच्या ओबीसी सूचीत पोवार, भोयर-पवार समाजासह प्रस्तावित सूचीतील समाजाला समाविष्ट न केल्यामुळे या समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणात आरक्षण मिळत नाही. केंद्राच्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश मिळत नसल्याचे उच्च शिक्षणापासून वंचित राहावे लागत आहे.

त्यामुळे त्यांच्या भवितव्यावर परिणाम होत असून तातडीने या समाजाला राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारने तातडीने निर्णय घ्यावा अशी मागणी खासदार अमर काळे यांनी संसदेत केली.

मागासवर्ग आयोगाने केंद्र सरकारच्या ओबीसी सूचीत समाविष्ट करण्यासाठी सादर केलेल्या शिफारस प्रस्तावात बडगुजर, सूर्यवंशी गुजर, लेव गुजर, रेव्ह गुजर, रेवा गुजर, पोवार-भोयर-पवार, केपवार, मुन्नार केपवार, मुन्नार कापू, तेलंगाना, तेलंगी, पेटारेड्डी, रुककरी, लोध-लोधा-लोधी व डंगारी या जातीचा समावेश आहे. हयाबाबतीत तातडीने निर्णय घेण्याची मागणी खा. अमर काळे यांनी केली आहे.

आश्रमशाळेतील प्रश्नांवर आदिवासी मंत्र्यांशी सकारात्मक चर्चा; आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने मंत्री, सचिव, आयुक्तांसोबत सहविचार सभा

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे सरकार्यवाह तथा आमदार सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्यासोबत लोहगड बंगला, मुंबई येथे २५ मार्च २०२५ रोजी राज्यातील आदिवासी विकास विभागाअंतर्गत शासकीय / अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक - शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित समस्या निवारणार्थ सहविचार सभा पार पडली. यावेळी शासकीय / अनुदानित आश्रम शाळेतील मुलांच्या भोजनाची वेळ बदलून ती सकाळी १० वाजता करण्यात यावी, याबाबत चर्चा करण्यात आली. याबाबत लवकरच सकारात्मक निर्णय घेण्यात येईल असे आश्वासन मंत्री महोदय यांनी दिले.

अनुदानित आश्रमशाळेतील विशेष खास बाब म्हणून मान्यता देण्यात आलेल्या १४३३ कर्मचाऱ्यांचे थकबाकी वेतन अदा करण्यात यावी, याबाबत आमदार सुधाकर अडबाले यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात लक्षवेधी सूचना मांडली होती. त्यावर बैठकीत चर्चा करण्यात आली. याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याचे निर्देश मंत्री डॉ. अशोक उईके यांनी सचिव महोदयांना दिले.

१९८२/८४ ची जुनी पेन्शन योजना जशीची तशी लागू करण्यात यावी. यासंदर्भात मा अपर आयुक्त, नागपूर यांचे दि. १०/१०/२०२४ चे आदेश पूर्ववत कायम ठेवण्यात यावे, अशी मागणी केली. याबाबत वित्त विभागाच्या सल्ल्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल अशी माहिती मा. सचिव महोदय यांनी दिली.

तसेच शासकीय व अनुदानित आश्रमशाळेतील शिक्षक व कर्मचारी यांचे वेतन एक तारखेला करण्यात यावे, आदिवासी नक्षलग्रस्त भागात कार्यरत कर्मचाऱ्यांना जो वेतन आयोग लागू असेल त्यानुसार बेसिकच्या १५इ मर्यादित किमान २०० व कमाल १५०० यानुसार प्रोत्साहन भत्ता लागू करणे, शाळा व वसतिगृह विभाग वेगळा करण्यात यावा, नवीन आकृतीबंध रद्द करून विलोपित झालेली पदे पुनर्जीवित करण्यात यावीत. विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वर्ग चार कर्मचाऱ्यांच्या पदांना मंजुरी देण्यात यावी, शिक्षकांची अशैक्षणिक कामे कमी करणे, अनुदानित आश्रम शाळेतील कर्मचाऱ्यांना ऱ्इए मध्ये समाविष्ट करून ईँ- एँ३ देण्यात यावे, रोजंदारी (वर्ग ३ व वर्ग ४) व कंत्राटी (कला, क्रीडा, संगणक) तत्वावरील कर्मचाऱ्यांना कायम करावे तसेच रिक्त पदावर तातडीने भरती करावी, शासकीय व अनुदानित आश्रम शाळेत नर्स पदाची भरती प्राधान्याने करण्यात यावी, शिक्षकांना १०-२०-३० ही तीन लाभांची आश्वासित प्रगती योजना लागू करण्यात यावी, शिक्षण कक्षातील पदोन्नती कोट्यातील पदे तातडीने भरण्यात यावी व शिक्षण कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात यावा, मुख्याध्यापकांना राजपत्रित अधिकाऱ्याचा दर्जा देण्यात यावा, कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षकांकरिता पदोन्नतीचे सेवा प्रवेश नियम तयार करून त्यांना पदोन्नतीची संधी देण्यात यावी, ग्रंथपालांना सुधारित वेतनश्रेणी व पदोन्नतीची संधी उपलब्ध करून देण्यात यावी, अनुदानित आश्रमशाळेकरीता असलेला 'काम नाही वेतन नाही' हा शासन निर्णय रद्द करण्यात यावा, चारही विभागातील बदल्या ह्या दिनांक ९ एप्रिल २०१८ च्या सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णयानुसार समुपदेशनानेच व पारदर्शक पद्धतीने केल्या जाव्यात, प्रतिनियुक्तीच्या धोरणाची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी तसेच शिक्षक संवर्गास कोणत्याही परिस्थितीत प्रतिनियुक्ती देण्यात येऊ नये, शासकीय व अनुदानित आश्रम शाळेतील माध्यमिक शिक्षकांना एक स्तर अंतर्गत ४८०० ग्रेडवेतन व प्राथमिक शिक्षकांना ४३०० ग्रेडवेतन लागू करण्यात यावे, दहावी व बारावीचा निकाल ५०इ किंवा ८०इ च्या आत असल्यास शिक्षक व मुख्याध्यापक यांची वेतनवाढ थांबवण्यात येऊ नये, सर्व आश्रम शाळांमध्ये लिपिक संवर्गाचे पद मंजूर करून त्यांची भरती करण्यात यावी. मंजूर असलेल्या पदावर नियमित भरती होईपर्यंत मानधन तत्वावर लिपिक संवर्गीय पद भरण्यास मंजुरी देण्यात यावी व इतर समस्यांवर सकारात्मक चर्चा करण्यात आली. आश्रमशाळेतील शिक्षकांचे प्रलंबित प्रश्न प्राधान्याने सोडविले जातील, असे आश्वासन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोकजी उईके, मा. सचिव, आयुक्त यांनी यावेळी दिले. सदर सभा दीड तास चालली.

बैठकीला आदिवासी विकास विभागाचे राज्यमंत्री इंद्रनील नाईक, सचिव विजय वाघमारे, आयुक्त लिना बनसोडे, अपर आयुक्त अमरावती जितेंद्र चौधरी, उपसचिव श्री. जाधव, कक्ष अधिकारी श्री. बंडगर, अपर आयुक्त नागपूर उपायुक्त श्री. दिगंबर चव्हाण, अन्य अधिकारी, सिटू संघटनेचे राज्याध्यक्ष डॉ. डी एल कराड, राज्य सरचिटणीस प्रा. बी टी भामरे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे प्रांतीय उपाध्यक्ष जयदीप सोनखासकर, शशांक मोहोड, सिटू संघटनेचे नागपूर विभागीय अध्यक्ष आर. टी. खवशी, संस्कृती संघटनेचे भोजराज फुंडे, अमोल वाबळे, शरद बिरादार, माधुरी पवार व समस्याग्रस्त शिक्षक उपस्थित होते.

जिल्ह्यातील २३ ग्रा.पं. क्षेत्रात होणार आदर्श आपले सरकार केंद्र पालकमंत्री भोयर यांचा पुढाकर, ४ कोटी ६० लाख रूपयांचा निधी मंजूर

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : जिल्ह्यातील मोठया ग्रामपंचायत क्षेत्रातील नागरिकांना आपल्या परिसरात शासनाच्या सुविधा तातडीने व सुलभतेने मिळाव्या यासाठी पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या पुढाकारामुळे २३ आदर्श आपले सरकार केंद्र सुरू करण्यास परवानगी मिळाली आहे. या केंद्रासाठी ४ कोटी ६० लक्ष रूपयांचा निधी देखील मंजूर करण्यात आला आहे.

शासनाच्या विविध योजनांचा लाभ व कागदपत्रांसाठी नागरिकांना तहसील अथवा अन्य सरकारी कार्यालयात जावे लागते. जिल्ह्यातील काही ग्रामपंचायतीची लोक संख्या मोठी असल्याने येथील नागरिकांना विविध अडचणीं सामोरे जावे लागते. शासकीय कार्यालयातील कामकाजासाठी प्रचंड वेळ लागत असल्याने नागरिकांना अनेकदा येरझारा माराव्या लागत होत्या. वर्धा शहरालगतच्या सोबतच्या जिल्ह्यात देखील अनेक ग्रामपंचायती लोकसंख्येने मोठया आहे. या ग्रामपंचायत क्षेत्रात आदर्श आपले सरकार केंद्र सुरू करून येथील नागरिकांना सहजतेने शासकीय योजनांचा लाभ व आवश्यक कागदपत्रे मिळावी, यासाठी जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी पुढाकार घेतला. सन २०२४-२५ मधील जिल्हा वार्षिक योजनेतंर्गत वर्धा तालुक्यातील पिपरी (मेघे), सिंदी (मेघे), नालवाडी, पवनार, साटोडा, बोरगांव (मेघे), सावंगी (मेघे), आंजी (मोठी), सालोड (हिरापूर), म्हसाळा, वरुड, वायगांव, उमरी (मेघे), सेवाग्राम, सेलू तालुक्यातील घोराड, केळझर, हिंगणी, देवळी तालुक्यातील नाचणगांव, गुंजखेडा, आष्टी तालुक्यातील तळेगांव (श्यापं), हिंगणघाट तालुक्यातील अल्लीपूर, वडनेर व समुद्रपूर तालुक्यातील गिरड या ग्रापं क्षेत्रात अदर्श आपले सरकार केंद्र सुरू करण्यास मान्यता दिली आहे.

प्रत्येक केंद्रासाठी २० लक्ष रूपयांची तरतूद

जिल्ह्यातील २३ ग्रापं क्षेत्रात आदर्श आपले सरकार केंद्राची उभारणी करण्यासाठी प्रत्येक केंद्राला २० लक्ष रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. २३ केंद्रासाठी एकूण ४ कोटी ६० लक्ष रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

नागरिकांना चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न

जिल्ह्यातील २३ ग्रापं आकाराने मोठया असून येथील लोकसंख्या मोठी आहे. येथील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ सहज मिळावा तसेच विधार्थी व नागरिकांना कामकाज संबंधी कागदपत्रे तातडीने मिळावी. यासाठी आदर्श आपले सरकार केंद्र सुरू करण्यात येत आहे. या केंद्रातून नागरिक विविध योजनांचे अर्ज भरू शकतात. तसेच विधार्थी देखील लाभ घेऊ शकतात. लवकरात लवकर केंद्र सुरू करण्यात येईल. असे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी सांगितले

पालकमंत्री डॉ. पंकज भोयर २९ मार्च पासुन चार दिवस जिल्ह्याच्या दौऱ्यावर

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा:राज्याचे गृह(ग्रामीण), गृह निर्माण, शालेय शिक्षण, सहकार व खनीकर्म राज्यमंत्री तथा जिल?ह्याचे पालकमंत्री डॉ. पंकज भोयर दि. २९ मार्च रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत असून दि. १ एप्रिल पर्यंत जिल?ह्यातील विविध कार्यक्रमास उपस्थित राहणार आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.

दि.२९ मार्च रोजी रात्री १०.५० वाजता वर्धा येथे आगमन व राखीव. दि. ३० मार्च रोजी पहाटे ५ वाजता सोशालिस्ट चौक येथे आयोजित पाडवा पहाट कार्यक्रमास उपस्थिती. सकाळी ८.३० वाजता नागपूर कडे प्रयाण करतील. सायंकाळी ४ वाजता नागपूर येथून वर्धा कडे प्रयाण सायंकाळी ५ वाजता पिपरी मेघे येथे आगमन पिपरी मेघे येथील इको पार्क येथील विकास कामांचा भूमीपूजन कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ६.३० वाजता साईबाबा देवस्थान सानेगुरुजी नगर प्रांगण येथे आयोजित संगितमय देवी भागवत ज्ञानदय सप्ताह कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ७ वाजता बजरंगबली देवस्थान शिवमंदिर इंदिरा नगर आर्वी नाका येथे आयोजित संगितमय देवी भागवत ज्ञानदय सप्ताह कार्यक्रमास उपस्थिती.

दि. ३१ मार्च रोजी सकाळी १० वाजता जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था कार्यालय येथे आयोजित बक्षिस पुस्तक वितरण समारंभ कार्यक्रमास उपस्थिती. दुपारी १२ ते १.४५ पर्यंत राखीव दुपारी २ वाजता सावित्रीबाई फुले सभागृह ग्रामपंचायत जवळ मसाळा येथे आयोजित महिला दिन कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ४ वाजता दत्ता मेघे सभागृह येथे आयोजित लोकमत संखी मंच कार्यक्रमास उपस्थिती. सांयकाळी ७ वाजता डॉ. प्रविण माहेश्वरी यांचेकडे सदिच्छा भेट देतील. दि. १ एप्रिल रोजी सकाळी भाजपा कार्यालयात प्रमुख पदाधिका-यांसमवेत बैठकीस उपस्थिती. दुपारी १२ ते १ राखीव. दुपारी १ वाजता वर्धा येथून देवळी कडे प्रस्थान करतील दुपारी १. १५ वाजता छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृह नगर परिषद देवळी येथे नाट्यगृह लोकार्पण सोहळ्यास उपस्थिती. दुपारी २.४५ वाजता देवळी येथून वर्धा कडे प्रयाण करतील. दुपारी ३ वाजता मुरारका ले आऊट लहरी नगर नालवाडी येथे जेष्ठ नागरिक भवनाच्या उद्घाटन समारंभ कार्यक्रमास उपस्थिती. सायंकाळी ५ वाजता वर्धा येथून नागपूर कडे प्रयाण करतील.

उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याचे आवाहन; ३० जुन पर्यंत मुदतवाढ

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : १ एप्रिल २०१९ पुर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यासाठी दि. ३० जुन पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून वाहन धारकांनी आपल्या वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसवून घ्यावी असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्नेहा मेढे यांनी केले आहे.

जिल्ह्यात आज पर्यंत ३ हजार ९६० वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यात आली असून २० हजार ३२७ वाहनधारकांनी पाटी बसविण्यासाठी ऑनलाईन अर्ज केलेला आहे. जिल्ह्याकरीता मे रिअल मेझॉन इंडिया लिमिटेड ही एजन्सी निश्चित करण्यात आली आहे. या एजन्सी मार्फत वर्धा, सेलू, देवळी, आर्वी, आष्टी व समुद्रपूर येथील अधिकृत फिटनेस सेंटरमध्ये उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याची सुविधा निर्माण करुन देण्यात आली आहे. तसेच हिंगणघाट तालुक्यात सेवा पुरवठा धारकांकडून लवकरच फिटनेस सेंटर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

सदर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याकरीता दुचाकी व ट्रॅक्टरसाठी जीएसटी वगळून ४५० रुपये, तिनचाकी वाहनासाठी ५०० रुपये व इतर सर्व वाहनांकारीता ७४५ रुपये आकारण्यात येणार आहे. उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी लावण्यासाठी मे रिअल मेझॉन इंडिया लिमिटेड या कंपनीच्या प्लेः//प्लेस्पेदहा२.ग्ह या पोर्टल वर अर्ज करुन नंबर पाटी आरक्षित करता येणार आहे.

एका ठिकाणी किमान २५ किंवा यापेक्षा जास्त दुचाकी, चारचाकी, ऑटो रिक्षा, टॅक्सी, बस व ट्रक मालकांनी नोंदणी क्रमांक पाटी लावण्यासाठी अर्ज केल्यास कंपनीकडून सबंधीत ठिकाणी किंवा हाऊसिंग सोसायटी मध्ये सबंधीत एजन्सी मार्फत कोणतेही होम फिटनेस शुल्क न आकारता नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे स्नेहा मेढे यांनी सांगितले.

अनुसुचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य ॲड धर्मपाल मेश्राम २ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौऱ्यावर

वर्धा ■ प्रतिनिधी

वर्धा : महाराष्ट्र राज्य अनुसुचित जाती जमाती आयोगाचे उपाध्यक्ष तथा सदस्य (सचिव दर्जा) ॲड धर्मपाल मेश्राम दि. ४ एप्रिल रोजी जिल्ह्याच्या दौ-यावर येत आहे. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढील प्रमाणे आहे.

दि. ४ एप्रिल रोजी सकाळी १० वाजता शासकीय विश्रामगृह येथे आगमन सकाळी ११ ते १२ वाजता जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्यासोबत सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांबाबत आढावा बैठकीस उपस्थिती. दुपारी १२ ते १ वाजता मुख्याधिकारी नगर परिषद वर्धा यांच्या सोबत आढावा विविध कामाची पाहणी, दुपारी १ ते २ मुख्याधिकारी नगर परिषद आर्वी यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. दुपारी २ ते २.३० राखीव दुपारी २.३० ते ३.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद देवळी यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी, दुपारी ३.३० ते ४.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद हिंगणघाट यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी, दुपारी ४.३० ते सायंकाळी ५.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद पुलगाव यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी. सायंकाळी ५.३० ते ६.३० वाजता मुख्याधिकारी नगर परिषद सिंदी रेल्वे यांचे सोबत आढावा व कामाची पाहणी करतील. त्यानंतर सोइनुसार नागपूर कडे प्रयाण करतील.

हिंदी विद्यापीठात 'आधुनिक अर्थव्यवस्थेत भारतीय शेतकऱ्यांचे प्रश्न' या विषयावर व्याख्यान आयोजित

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठातील इतिहास विभागाने गुरुवार, २७ मार्च रोजी महादेवी वर्मा सभाघर येथे 'आधुनिक अर्थव्यवस्थेतील भारतीय शेतकऱ्यांचे प्रश्न' या विषयावर एक विशेष व्याख्यान आयोजित केले. प्रमुख वक्ते म्हणून आमंत्रितः अॅड. दिनेश शर्मा यांचे स्वागत विभागप्रमुख प्रा. फरहाद मलिक, प्रभारी डॉ. बालाजी चिर्डे, डॉ. अन्वर अहमद सिद्दीकी, डॉ. मुन्नालाल गुप्ता यांनी केले. कार्यक्रमात प्रमुख पाहुणे अॅड. दिनेश शर्मा यांनी भारतीय शेतकऱ्यांचे प्रश्न आणि आधुनिक अर्थव्यवस्थेतील शेतकऱ्यांच्या ज्वलंत समस्या स्पष्ट करताना शेतकऱ्यांच्या दयनीय स्थितीवर आणि त्यातून उद्भवणाऱ्या अडचणींवर सविस्तर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात प्रा. फरहाद मलिक म्हणाले की, भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांचे सर्व प्रकारे शोषण होताना दिसते. शेतीसाठी जमीन असूनही, शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांना योग्य किंमत मिळत नाही, ज्यामुळे भारतीय शेतकरी असहाय्य जीवन जगण्यास भाग पाडला जात आहे. कार्यक्रमात उपस्थित असलेले विद्यार्थी आणि शिक्षकांनी त्यांचे प्रश्न आणि शंका प्रमुख वक्त्यांसमोर मांडल्या आणि त्यांना योग्य ती उत्तरे मिळाली. कार्यक्रमाची ओळख इतिहास विभागाचे प्रभारी डॉ. बालाजी चिराडे यांनी करून दिली. कार्यक्रमाचे संचालन डॉ. मुन्नालाल गुप्ता यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. अन्वर अहमद सिद्दीकी यांनी केले. यावेळी शिक्षक, संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जिल्हा क्रिडा अधिकाऱ्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी

परभणी ■ वसंत आवटे



परभणी, कामांच्या थकीत बिलांच्या मंजूरीकरीता सुमारे दीड लाख रुपयांची लाच स्विकारणाऱ्या वादग्रस्त जिल्हा क्रिडा अधिकारी कविता नावंदे-निंबाळकर व क्रिडा अधिकारी नानकसिंह बस्सी या दोघांना लाच लुचपत प्रतिबंधक खात्याच्या एका पथकाने मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. शुक्रवारी (दि.२८) या दोघांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सूनावली आहे. क्रिडा अॅकॅडमीच्या जागेवरील स्विमिंग पुलाच्या बांधकामासह या स्विमिंग पुलावर २०२४ साली आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धांच्या एकूण ९५ लाख रुपयांचे थकीत बिल मिळावे यासाठी तक्रारकर्त्याने जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयाकडे पाठपुरावा सुरु केला, परंतु प्रत्येकवेळी जिल्हा क्रिडा अधिकारी कविता नावंदे यांनी जाणिवपूर्वक त्रुटी काढल्या. त्यामुळे संबंधित कंत्राटदाराने या थकीत बिलांच्या मंजूरीकरीता क्रिडा अधिकारी बस्सी व जिल्हा क्रिडा अधिकारी नावंदे या दोघांच्या ३ मार्च रोजी स्वतः भेटी घेतल्या. त्यावेळी नावंदे यांनी २ लाख रुपये व बस्सी यांनी ५० हजार रुपये असे एकूण २ लाख ५० हजार रुपयांची लाच मागितली. संबंधित तक्रारकर्त्याने १३ मार्च रोजी नावंदे यांना क्रिडा अधिकारी बस्सी यांच्या समक्ष १ लाख रुपये सुपूर्त केले परंतु, उर्वरित दीड लाख रुपये द्यावयाची इच्छा नसल्याने या तक्रारकर्त्याने २४ मार्च रोजी लाच लुचपत प्रतिबंधक खात्याकडे एक तक्रार दाखल केली. या खात्याच्या पथकाने २४ मार्च रोजीच लाच मागणीची पडताळणी केली. बस्सी व नावंदे यांची भेट झाली नाही. २५ मार्च रोजी पुन्हा पडताळणी केली. त्यावेळी नावंदे यांची भेट झाली. तक्रारकर्त्याने प्रलंबित लाचेसंदर्भात बोलले असता नावंदे यांनी पक्षा समक्ष तक्रारकर्त्यास बस्सी सर येतील ते करुन टाका, असे म्हणून उर्वरित लाचेची रक्कम स्विकारण्यास सहमती दर्शविली. या खात्याने त्या आधारे गुरुवार २७ मार्च रोजी सापळा रचला व नानकसिंह बस्सी यास ५० हजार रुपये व जिल्हा क्रिडा अधिकारी नावंदे यांना १ लाख रुपयांची लाच स्विकारतांना ताब्यात घेतले. शुक्रवारी (दि.२८) या दोघांना न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयाने त्यांना दोन दिवसांची पोलिस कोठडी सूनावली आहे.

प्रधानमंत्री आवास योजनेच्या ड यादीचे सर्वेक्षण करून गरीबांना घरे द्याः आमदार समिर कुणावार यांची सभागृहात मागणी

हिंगणघाट ■ प्रतिनिधी



हिंगणघाट : केंद्र सरकारनेच्या वतीने गरीबांना हक्काचे घर देण्यासाठी प्रधानमंत्री आवास योजना व महाराष्ट्र सरकारचा वतीने मोदी आवास योजना अमलात आणली आहे. प्रधानमंत्री आवास योजनेत २०१९ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात अनेक गरजू लाभार्थ्यांना अपात्र ठरविण्यात आले होते. त्यानंतर या सर्वेक्षणात अपात्र ठरविण्यात आलेल्या तसेच सुटलेल्या लाभार्थ्यांचा समावेश प्र परीपत्रक ड मध्ये समावेश करण्यात आला होता. मात्र सरकारकडून अद्यापही या संबंधी ठोस निर्णय घेतला नाही यामुळे हिंगणघाट विधानसभा मतदारसंघाचे आमदार समिर कुणावार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात सभागृहात प्रधानमंत्री आवास योजने संबधी मुद्दा उपस्थित केला. तसेच आमदार समिर कुणावार यांनी प्रधानमंत्री आवास योजना व मोदी आवास योजना हा प्रधानमंत्री व मुख्यमंत्री यांचा ड्रीम प्रोजेक्ट आहे. यावर तातडीने लक्ष द्यावे. तसेच प्रधानमंत्री आवास योजना, मोदी आवास योजनेचा पहिल्या हप्ता सहा सहा महिने दिल्या जात नाही यामुळे गोरगरीब लोकांना पंचायत समिती तसेच नगर परिषदेकडे चकरा माराव्या लागत आहे तरी पहिला हप्ता ३० दिवसाचे आत मिळाला पाहिजे अशी मागणी सभागृहात आमदार समिर कुणावार यांनी केले यावेळी ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांनी आवास योजनेचा पहिल्या हप्त्याला विलंब करणाऱ्यावर कारवाई करण्यात येईल तसेच प्रधानमंत्री आवास योजना सर्वेक्षण करून गरजू गरीब लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना व मोदी आवास योजनेचा लाभ दिल्या जाईल असे आश्वासन दिले.

यावेळी आमदार समिर कुणावार यांनी हिंगणघाट शहरात मंजूर करण्यात आलेले ४०० खाटाचे रुग्णालयाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून द्यावी या मंजूर रुग्णालयाची वाट विधानसभा मतदारसंघातील नागरिक मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहे. यामुळे यावर तात्काळ निधी उपलब्ध करून देऊन कामाला सुरुवात करावी अशी मागणी सुध्दा सभागृहात मंत्री महोदया समोर केली आहे.

जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात चोरी करणारी टोळी गजाआड

परभणी ■ वसंत आवटे

स्थानिक गुन्हा शाखेची कारवाई : चोरीची मोटारसायकल व १२ हजार रुपये जप्त



परभणी, जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात घरफोडी व मोटार सायकल चोरणारी टोळी पकडण्यात स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकास यश आले असून त्याचे ताब्यातून एक चोरीची मोटार सायकल व मोटार सायकल विकून मिळालेले नगदी १२ हजार रुपये देखील हस्तगत करण्यता आले. पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांनी पाथरी पोलिस स्टेशन अंतर्गत दाखल घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील यांना मार्गदर्शनपर सुचना देवून आदेशीत केले. त्यावरून पथक तयार करून रवाना करण्यात आले. हे पथक शोध घेत असताना सदरचा गुन्हा हा आरोपी संदीप उर्फ भोला मधुकर घोडे, जनार्धन चव्हाण, कृष्णा साहेब घोडे (सर्व रा. खवने पिंपरी) यांनी केला असल्याची गोपनीय माहिती मिळाल्या वरून नमूद आरोपींना सापळा रचून मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. त्यांना विश?वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केला असल्याची माहिती दिली. यावेळी गुन्ह्यातील गेल्या माला पैकी नगदी १२ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. तसेच सदर गुन्ह्यातील सोन्याचे दागिने घेतलेले राधाकिसन दशरथ आठवे (रा. खवणे पिंपरी) यालाही तपासकामी ताब्यात घेतले आहे. आरोपी संदीप उर्फ बोला याच्याकडे मिळून आलेली मोटरसायकल पोस्टे शिक्रापूर जिल्हा पुणे ग्रा. र. नं. ८२१/२०२४ कलम ३०३ (२) बी. एन. एस. मधील चोरी केलेली आहे. वर नमूद चार आरोपी व सदर गुन्ह्यातील मुद्देमाल नगदी १२ हजार रुपये, पोलीस स्टेशन शिक्रापूर ग्रा. र. नं. ८२१/२०२४ कलम ३०३ (२) बी. एन. एस. मधील चोरी केलेली मोटर सायकल ही पुढील तपास कामी पोलीस स्टेशन पाथरी येथे हजर करण्यात आले आहेत. दरम्यान, ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांचे नेतृत्वात पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, स्थानिक गुन्हे शाखा परभणी पोलीस उपनिरीक्षक गोपीनाथ वाघमारे, अजित बिरादार, चंदन परिहार, पोलीस अंमलदार विलास सातपुते, सचिन भदर्गे, रंगनाथ दुधाटे, बाळासाहेब कदम, विष्णू चव्हाण, सिद्धेश्वर चाटे, मधुकर ढवळे, राम पोळ, नामदेव दुब्बे, चंद्रकांत शिंदे, प्रीती दूधवडे, संजय घुगे स्था. गु. शा. परभणी यांचे सह सायबर पो. स्टे. चे गणेश कौटकर यांनी मिळून केली.

जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात चोरी करणारी टोळी गजाआड

परभणी ■ वसंत आवटे

स्थानिक गुन्हा शाखेची कारवाई : चोरीची मोटारसायकल व १२ हजार रुपये जप्त

परभणी, जिल्ह्यासह इतर जिल्ह्यात घरफोडी व मोटार सायकल चोरणारी टोळी पकडण्यात स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकास यश आले असून त्याचे ताब्यातून एक चोरीची मोटार सायकल व मोटार सायकल विकून मिळालेले नगदी १२ हजार रुपये देखील हस्तगत करण्यता आले. पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांनी पाथरी पोलिस स्टेशन अंतर्गत दाखल घरफोडीच्या गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यासाठी स्थानिक गुन्हा शाखेचे पोलिस निरीक्षक विवेकानंद पाटील यांना मार्गदर्शनपर सुचना देवून आदेशीत केले. त्यावरून पथक तयार करून रवाना करण्यात आले. हे पथक शोध घेत असताना सदरचा गुन्हा हा आरोपी संदीप उर्फ भोला मधुकर घोडे, जनार्धन चव्हाण, कृष्णा साहेब घोडे (सर्व रा. खवने पिंपरी) यांनी केला असल्याची गोपनीय माहिती मिळाल्या वरून नमूद आरोपींना सापळा रचून मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले. त्यांना विश?वासात घेऊन विचारपूस केली असता त्यांनी गुन्हा केला असल्याची माहिती दिली. यावेळी गुन्ह्यातील गेल्या माला पैकी नगदी १२ हजार रुपये जप्त करण्यात आले आहेत. तसेच सदर गुन्ह्यातील सोन्याचे दागिने घेतलेले राधाकिसन दशरथ आठवे (रा. खवणे पिंपरी) यालाही तपासकामी ताब्यात घेतले आहे. आरोपी संदीप उर्फ बोला याच्याकडे मिळून आलेली मोटरसायकल पोस्टे शिक्रापूर जिल्हा पुणे ग्रा. र. नं. ८२१/२०२४ कलम ३०३ (२) बी. एन. एस. मधील चोरी केलेली आहे. वर नमूद चार आरोपी व सदर गुन्ह्यातील मुद्देमाल नगदी १२ हजार रुपये, पोलीस स्टेशन शिक्रापूर ग्रा. र. नं. ८२१/२०२४ कलम ३०३ (२) बी. एन. एस. मधील चोरी केलेली मोटर सायकल ही पुढील तपास कामी पोलीस स्टेशन पाथरी येथे हजर करण्यात आले आहेत. दरम्यान, ही कारवाई पोलीस अधीक्षक रविंद्रसिंह संतोषसिंह परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक यशवंत काळे यांचे नेतृत्वात पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, स्थानिक गुन्हे शाखा परभणी पोलीस उपनिरीक्षक गोपीनाथ वाघमारे, अजित बिरादार, चंदन परिहार, पोलीस अंमलदार विलास सातपुते, सचिन भदर्गे, रंगनाथ दुधाटे, बाळासाहेब कदम, विष्णू चव्हाण, सिद्धेश्वर चाटे, मधुकर ढवळे, राम पोळ, नामदेव दुब्बे, चंद्रकांत शिंदे, प्रीती दूधवडे, संजय घुगे स्था. गु. शा. परभणी यांचे सह सायबर पो. स्टे. चे गणेश कौटकर यांनी मिळून केली.

पुलगावलगतच्या दहा गावांची समस्या मांडली केंद्रीय संरक्षणमंत्र्यांकडे ; खासदार अमर काळे यांनी केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग यांची दिल्ली येथे घेतली भेट

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : लोकसभा मतदारसंघातील पुलगाव भांडारालगतच्या १० गावावरील लावलेले निर्बंध उठवा किंवा या गावांचे इतरत्र पुनर्वसन करावे, अशी मागणी खासदार अमर काळे यांनी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्याकडे गेली. याबाबत खासदार अमर काळे यांनी केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग यांची दिल्ली येथे भेट घेऊन ही समस्या मांडली.

लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी दिल्ली येथे केंद्रीय मंत्री राजनाथसिंग यांची भेट घेऊन पुलगाव येथील भांडारालगतच्या नाचणगाव, गुंजखेडा, लक्ष्मीनारायणपूर, आगरगाव, सोनेगाव (आबाजी), मूरदगाव, मलकापूर, कवठा (रेल्वे), कवठा (झो), नागरी, येसगाव या गावांवर विविध विकास कामे, जसे विंधन विहीर खोदणे, घराचे बांधकाम, विहीरी खोदणे इत्यादी कामे करण्यावर प्रतिबंध लावण्यात आले आहेत. त्यामुळे या गोष्टीचा तेथील १० गावातील लोकांना कोणतीही विकासात्मक किंवा सुधारणा विषयक कामे करता येत नाही. त्यामुळे तेथील नागरीकांना अडचणी निर्माण झाल्या आहेत ही बाब दिलीप अग्रवाल यांनी नागरीकांसह खासदार अमर काळे यांना भेटून त्यांचे कानावर घातली. गावावरील निर्बंध उठवा अन्यथा आमचे सुरक्षित स्थळी पुनर्वसन करण्याची मागणी यावेळी करण्यात आली. विषयाचे गांभिर्य लक्षात घेता खासदार अमर काळे यांनी दिल्ली येथील संरक्षरण मंत्री राजनाथसिंग यांची भेट घेऊन पुलगाव लगतच्या १० गावावरील लावलेले निर्बंध हटवा किंवा या गावांचे इतरत्र सुरक्षित स्थळी पुर्नवसन करण्याची आग्रही मागणी त्यांचेकडे केली. याप्रसंगी केंद्रीय मंत्री राजनाथ सिंग केंद्रीय यांनी तात्काळ योग्य कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता. आष्टी जि. वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242